दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र वर्ष - ४ अंक-२१६ गुरूवार दि.२८ नोव्हेंबर २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने- ६ किंमत ३ रूपये

## संपादकीय

### विरोधी पक्षावर सगळ्यात मोठी जबाबदारी !

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीला सपाटून मार खावा लागल्याने विरोधकांपुढील आव्हान आता अधिक खडतर बनल्याचे दिसून येते. लोकसभा निवडणुकीत जनतेने महायुतीऐवजी आघाडीच्या पारड्यात मतांचे भरभरून दान टाकले. त्यामुळे आघाडीच्या ४८ पैकी तब्बल ३१ जागा निवडून आल्या. मात्र, हा फुगा इतक्या लवकर फुटेल, याची कल्पना विरोधकांबरोबरच सत्ताधाऱ्यांनाही नसावी. एकीकडे भाजप, सेना, राष्ट्रवादी महायुतीने निर्विवाद यश मिळवत २३० जागा निवडून आणल्या. तर काँग्रेस, ठाकरेसेना आणि शरद पवार गटाला केवळ ४६ जागांवर समाधान मानावे लागले.

### सुनील तटकरेंनी घेतली देवेंद्र फडणवीसांची भेट

मुंबई : राष्ट्रवादीचे नेते सुनील तटकरेंनी देवेंद्र फडणवीसांची भेट घेतली आहे. फडणवीस यांच्या सागर बंगला या शासकीय निवासस्थानी सुनील तटकरेंनी फडणवीसांशी चर्चा केली आहे. विधानसभा निवडणुकीत महायुतीला मिळालेल्या यशाबद्दल तटकरेंनी फडणवीसांचे अभिनंदन केल्याची माहिती मिळत आहे.

# नैसर्गिक शेतीसाठी सरकारची नवी योजना

## शेतकऱ्यांना नेमका काय होणार फायदा, कसा घ्याल लाभ?

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

अलिकडच्या काळात अनेक ठिकाणी नैसर्गिक शेती केली जात आहे. केंद्र सरकारच्या माध्यमातून देखील नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्याचे कामे केले जात आहे. दरम्यान, नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र सरकाकरने एक मोठा निर्णय घेतला आहे. सरकारने नॅशनल मिशन ऑन नॅचरल फार्मिंग, अर्थात नैसर्गिक शेतीवरील राष्ट्रीय मिशनचा शुभारंभ करायला मंजुरी दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे.



१५ व्या वित्त आयोगापर्यंतचा २०२५-२६ मध्ये या योजनेसाठी एकूण २४८१ कोटी इतका खर्च नियोजित आहे. यामध्ये केंद्राचा आणि राज्याचा वाटा आहे. भारत सरकारचा वाटा १५८४ कोटी तर ◀◀ पान २ वर

### नैसर्गिक शेतीमुळे नेमकं काय होणार?

नैसर्गिक शेतीमुळे मातीची निरोगी परिसंस्था तयार होणार, जैवविविधतेला चालना मिळणार, स्थानिक शेतीमध्ये पर्याय वाढवण्यासाठी वैविध्यपूर्ण पीक पद्धतींना प्रोत्साहन मिळणार, पुढील दोन वर्षांत, इच्छुक असलेल्या ग्रामपंचायतींमधील १५००० क्लस्टरमध्ये एनएमएनएफ ची अंमलबजावणी १ कोटी शेतकऱ्यांना त्याचा लाभ होणार, ७.५ लाख हेक्टर क्षेत्रात नैसर्गिक शेती सुरू केली जाणार

### ऑफलाईन अर्ज करता येणार

इच्छुक लाभार्थी योजनेसाठी अर्ज करण्यासाठी जिल्हा परिषदेशी संपर्क साधू शकतात. जिल्हा परिषद अधिकारी अर्जदाराचे तपशील आणि प्रकल्प आराखडा राज्याच्या कृषी विभागाकडे सादर करतील. राज्य कृषी विभाग राज्य वार्षिक कृती आराखडा तयार करेल. राज्याकडून निधी मंजूर झाल्यानंतर, लाभार्थ्यांना आर्थिक सहाय्य जारी केले जाईल. सगळे शेतकरी या योजनेसाठी पात्र असतील.

### यशाचे डिझाईन राष्ट्रवादीचेच- अमोल मिटकरी

मुंबई : विधानसभेत मिळालेल्या यशाचे डिझाईन हे राष्ट्रवादीचेच असल्याचा दावा अमोल मिटकरींनी केला आहे. अजितदादांच्या अखंड मेहनतीने कमावलेले हे यश आहे. डिझाईन बॉक्स वाले अरोरा यशाचे श्रेय घेताहेत असे मिटकरींनी म्हटले आहे.

### फडणवीसांच्या निवासस्थानाबाहेर गर्दी

नागपुर-राज्यात भाजपचाच मुख्यमंत्री होणार असल्याचे निश्चित झाल्याने देवेंद्र फडणवीस यांच्या नागपुर येथील निवासस्थानी समर्थकांची मोठी गर्दी होऊ लागली आहे. एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री पदाच्या शर्यतीतून माघार घेतल्याने आता फडणवीस हेच मुख्यमंत्री होणार असल्याचे संकेत असल्याने कार्यकर्तेही जोशात असल्याचे दिसून येत आहे.

# शिंदेंनी दावा सोडला; महाराष्ट्रात भाजपचाच मुख्यमंत्री!

## महायुतीचे तीनही नेते आज दिल्लीत; फडणवीसांची वर्णी लागणार की नविन चेहऱ्याला मिळणार संधी





मुंबई । प्रतिनिधी


अगोदर राजीनामा, नंतर काळजीवाहू मुख्यमंत्री आणि आता एकनाथ शिंदे यांनी अखेर मुख्यमंत्रिपदाचा दावा सोडला आहे, त्यामुळे देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री बनणार की भाजप पक्ष नेतृत्व हे राजस्थान आणि मध्य प्रदेशच्या धर्तीवर महाराष्ट्रातही नविन चेहऱ्याला संधी देते याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे तीनही नेते गुरुवारी दिल्लीला जाणार असून अमित शहांसोबत त्यांची बैठक होणार आहे. याच बैठकीत मुख्यमंत्री कोण हे निश्चित होणार असल्याची माहिती आहे.

राज्यात महायुतीला बहुमत मिळाले तरी सुध्दा चार दिवसानंतरही सरकार स्थापन होत नसल्याने तसेच एकनाथ शिंदे यांनी मौन बाळगल्याने ते नाराज असल्याच्या चर्चा होत्या. मात्र महाराष्ट्राचे काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषद घेऊन आपली भुमिका स्पष्ट केली. या पत्रकार परिषदेमध्ये बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी ◀◀ पान २ वर

### एकनाथ शिंदेंना कोणते पद मिळणार?

महायुती सरकारच्या मंत्रिमंडळात एकनाथ शिंदेंचे स्थान काय असेल, या प्रश्नावरही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उत्तर दिले आहे. याबाबत आमच्या तिन्ही पक्षांची उद्या दिल्लीत बैठक होणार आहे. या बैठकीत जो निर्णय होईल, त्यानुसार मुख्यमंत्री व मंत्रिमंडळाचे सर्वकाही ठरेल, असे उत्तर एकनाथ शिंदेंनी दिले. त्यामुळे, मंत्रिमंडळात एकनाथ शिंदेंचे स्थान काय असेल हे उद्याच समजू शकते.

### कोणीही मुख्यमंत्री झाले तरी सुट्टी नाही-जरांगे



एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री पदाचा दावा सोडला हा त्यांचा राजकीय विषय आहे, त्याच्यावर आम्ही बोलणे योग्य नाही, आम्ही आमच्याच कामात आहोत, येत्या रविवारी आम्ही तुळजापूर दर्शनासाठी जात आहोत. मुख्यमंत्री कोणीही होवो, आम्हाला त्याच्याशी काही देणे घेणे नाही, परंतु मराठ्यांची एकजूट सरकारचा घाम फोडणारी आहे, कोणीही आले तरी आम्हाला सुख नव्हते, आम्हाला संघर्ष करावाच लागणार आहे. कोणीही मुख्यमंत्री झाले तरी आरक्षण घेणार, सुट्टी नाही, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे.

### पुढे काय होणार अजितदादांनी थेट सांगून टाकले



एकंदरीतच आम्ही तीनही जण गुरुवारी दिल्लीला जाणार आहोत. तिथे आमची सर्व पुढची चर्चा होईल. त्यानंतर नवीन मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री, सरकार अस्तित्वात येतील, अशी महत्त्वाची माहिती अजित पवारांनी दिली. येत्या ३० तारेखेपर्यंत किंवा १ डिसेंबरपर्यंत शपथविधीचा कार्यक्रम व्हायला पाहिजे, असे देखील अजित पवारांनी यावेळी स्पष्ट केले. तसेच खेळीमेळीच्या वातावरणात मुख्यमंत्री, दोन उपमुख्यमंत्री यांचा शपथविधी पार पडेल, असेही ते म्हणाले.

### बावनकुळेंनी मानले शिंदेंचे आभार



एकनाथ शिंदे यांची पत्रकार परिषद पार पडली, त्यानंतर भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची पत्रकार परिषद घेतली. यावेळी बावनकुळे यांनी एकनाथ शिंदे यांचे आभार मानले आहेत.

### गेवराई पंचायत समितीच्या बीडीओ पदाचा श्रीमती कांबळेंकडे पदभार

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई येथील पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी पदाचा श्रीमती एम.एस कांबळे यांनी बुधवार दि.२७ नोव्हेंबर रोजी पुन्हा गटविकास अधिकारी पदाचा पदभार स्विकारला आहे. त्यांना गेवराई तालुक्यातील पंचायत समिती स्तरावरील कामकामाचा चांगला अनुभव असून सर्वसामान्य नागरिकांचे कामे करणाऱ्या अधिकारी म्हणून त्यांची तालुक्यात ओळख आहे.




गेवराई येथील पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी श्रीमती एम.एस.कांबळे मॅडम या गेल्या महिन्यात रजेवर गेल्या होत्या दरम्यान पंचायत समितीचा गटविकास अधिकारी पदाचा पदभार अशोक राठोड यांच्याकडे दिला परंतू रजेचा कालावधी संपल्यानंतर बुधवार दि.२७ नोव्हेंबर पासून श्रीमती ◀◀ पान २ वर

# शिंदे सरकारमधील या मंत्र्यांना मिळणार डच्चू?









मुंबई । प्रतिनिधी

येत्या तीन दिवसात राज्यात महायुतीचे सरकार स्थापन होण्याची शक्यता असून शिंदे सरकारमधील काही मंत्र्यांना डच्चू मिळणार असल्याची माहिती आहे. त्यांच्या जागी नव्या चेहऱ्यांना संधी दिली जाण्याची दाट शक्यता आहे.

एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री पदावरचा दावा सोडल्याने आता लवकरच राज्यात नविन सरकारचा शपथविधी होण्याची शक्यता असून यात महायुतीतील तीनही पक्षांचे काही मंत्री शपथ घेणार आहेत. यात राष्ट्रवादीकडून ◀◀ पान २ वर

### कोणाला मिळणार डच्चू ?

विजयकुमार गावित (भाजप), सुधीर मुनगंटीवार (भाजप), दीपक केसरकर (शिंदेसेना), अब्दुल सत्तार (शिंदेसेना), संजय राठोड (शिंदेसेना) तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीतील काही जणांना सुध्दा डच्चू दिला जाणार असल्याची माहिती आहे.

### राष्ट्रवादीने मागितले ९ कॅबिनेट, ३ राज्यमंत्रीपदे?

अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने ९ कॅबिनेट आणि ३ राज्यमंत्री पदे भाजपकडे मागितले असल्याची माहिती आहे. त्यामुळे त्यांना मंत्रीपदात नेमका किती वाटा मिळतो हे पाहणे औत्सुक्याचे आहे.

### ठाकरे सेना मविआतून बाहेर पडणार?-दानवे

मुंबई । प्रतिनिधी

विधानसभेत झालेल्या पराभवानंतर आता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष स्वबळावर लढण्याची शक्यता आहे. त्यामुळे शिवसेना उबाठा हा पक्ष मविआतून बाहेर पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. उद्धव ठाकरेंनी विजय आणि पराभूत उमेदवारांची चर्चा केली. त्यातील बहुताश नेत्यांनी शिवसेनेने स्वबळावर लढवा अशी भूमिका घेतल्याची माहिती अंबादास दानवे यांनी दिली आहे. अनेक त्यांनी स्वबळावर लढवावे असे सांगितल्याचे दानवे म्हणाले आहेत. तसे झाले तर मविआसाठी हा सर्वात मोठा धक्का असू शकतो.



### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२६ नोव्हेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३.०० क्विंटल | २,८०१ | ३,११० | २,९५५ |
| ज्वारी/हायब्रिड: ४१.५० क्विंटल | १,८७० | २,८७० | २,२४६ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : १.०० क्विंटल | ८,००० | ८,००० | ८,००० |
| उडीद : ४९.०० क्विंटल | ५,००१ | ७,७६० | ६,७३३ |
| बाजरी: ६९.५० क्विंटल | २,१७७ | ३,००० | २,६६६ |
| मुग :४.०० क्विंटल | ७,२०० | ७,४८१ | ७,३४० |
| सोयाबीन: २६६.५० क्विंटल | ३,६०० | ४,१८५ | ४,११९ |
| हरभरा: १.०० क्विंटल | ४,६०० | ६,४०१ | ५,५०० |



बीड: वाल्मीक कराड यांनी मुंबई येथे राजेश विटेकर यांची भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या.

### खा.बजरंग सोनवणेंनी गडकरींची घेतली भेट


#### राष्ट्रीय महामार्गाच्या विकासकामांसंदर्भात दिले निवेदन

बीड। प्रतिनिधी

खा. बजरंग सोनवणे यांनी दिल्ली येथे केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गाच्या विकास कामासंदर्भात सविस्तर चर्चा केली. त्यानंतर मागण्यांचे निवेदनही दिले.

बीड लोकसभा मतदार संघातून निवडूण आल्यावर खा. बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय मंत्र्यांना भेटून जिल्ह्यातील विकास कामे मार्गी लावण्याचा प्रयत्न केला आहे. केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांची भेट दिल्लीत भेट घेऊन बीड जिल्ह्यातील (रा.मा. ५०) उमापुर फाटा - धोंडराई - उमापुर - बोधेगाव - शेवगाव ते नेवासा हा रस्ता राष्ट्रीय महामार्गात समाविष्ट करणे, राष्ट्रीय महामार्ग ५४८ ◀◀ पान २ वर





गेवराईचे आ. विजयसिंह पंडित यांची मुंबई येथे भेट घेऊन जयसिंह सोळुंके यांनी शुभेच्छा दिल्या.

# जयदत्त क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका लढवणार

## डॉ.योगेश क्षीरसागर यांची माहिती: आगामी निवडणुकांसाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे





बीड । प्रतिनिधी

माजी मंत्री जयदत्तअण्णा क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका लढविणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली आहे. तसेच, आगामी निवडणुकांच्या दृष्टीने कामाला लागा असे म्हणत पदाधिकारी, कार्यकर्त्यांना त्यांनी बळ दिले आहे.

विधानसभा निवडणुकीत महायुतीचे उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांना चुलते माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी पाठिंबा दिला होता. त्यावेळी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी आगामी सर्व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका त्यांच्या नेतृत्वाखाली लढविणार असल्याचे जाहीर केले होते. त्यानुसार आता काल झालेल्या पत्रकार परिषदेत तसे स्पष्ट केले आहे. त्यांनी जुने-नवे कार्यकर्ते एकत्र घेऊन एकदिलाने काम करू. सर्व कार्यकर्त्यांना बळ देण्यासाठी आपण खंबीरपणे पाठीशी उभा राहणार असून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका पूर्ण ताकतीने लढविणार असल्याचे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी म्हटले आहे.

## अग्रलेख

# विरोधी पक्षावर सगळ्यात मोठी जबाबदारी !

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीला सपाटून मार खावा लागल्याने विरोधकांपुढील आव्हान आता अधिक खडतर बनल्याचे दिसून येते. लोकसभा निवडणुकीत जनतेने महायुतीऐवजी आघाडीच्या पारड्यात मतांचे भरभरून दान टाकले. त्यामुळे आघाडीच्या ४८ पैकी तब्बल ३१ जागा निवडून आल्या. मात्र, हा फुगा इतक्या लवकर फुटेल, याची कल्पना विरोधकांबरोबरच सत्ताधाऱ्यांनाही नसावी. एकीकडे भाजप, सेना, राष्ट्रवादी महायुतीने निर्विवाद यश मिळवत २३० जागा निवडून आणल्या. तर काँग्रेस, ठाकरेसेना आणि शरद पवार गटाला केवळ ४६ जागांवर समाधान मानावे लागले. आजवरच्या इतिहासातील हा सर्वांत मोठा पराभव असून, त्याचे राज्याच्या राजकारणावर दूरगामी परिणाम संभवतात. राज्यात स्थिर आणि सक्षम सरकारसाठी पुरेसे बहुमत असणे आवश्यक होय. यंदाच्या विधानसभा निवडणुकीत सत्ताधाऱ्यांना स्पष्ट बहुमत मिळाल्याने सरकारच्या स्थिरतेबाबत कोणताही प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाही. असे असले, तरी विरोधी पक्षांमधील कोणत्याही पक्षाला २९ वा त्यापेक्षा अधिक जागा नसल्याने विरोध पक्षनेतेपदाचे काय, असा प्रश्न निर्माण होतो. २०१४ आणि २०१६ च्या निवडणुकीमध्ये देशात काँग्रेसची पीछेहाट झाल्याने त्यांनाही विरोधी पक्षनेतेपदावर पाणी सोडावे लागले होते. संसदीय राजकारणात विरोधी पक्षनेत्याचे महत्त्व अतिशय मोठे आहे. सरकारच्या चांगल्या निर्णयांना पाठिंबा व्यक्त करतानाच चुकीच्या निर्णयांना परखडपणे विरोध करणे, हे विरोधी पक्षनेत्याकडून अपेक्षित असते. पण, विरोधी पक्षनेता नसेल किंवा विरोधक कमकुवत, दुर्बल असतील, तर त्यातून लोकशाही प्रक्रियेत बाधा निर्माण होण्याची भीती असते. आत्तापर्यंतचा इतिहास तपासला, तर त्याचे तोटे सहज लक्षात येतील. हे पाहता महाराष्ट्रात विरोधी पक्षनेता नसल्याने विरोधकांचा आणि पर्यायाने जनतेचा आवाज क्षीण होण्याची चिन्हे दिसतात. राज्याच्या मुख्यमंत्रिपदावर सध्या देवेंद्र फडणवीस यांचे नाव आघाडीवर दिसत आहे. कोणत्याही क्षणी भाजपाकडून मुख्यमंत्रिपदाचे नाव जाहीर केले जाऊ शकते. त्यानंतर शपथविधी, मंत्रिमंडळाचा विस्तार हे सोपस्कारही पार पडतील. लोकांनी ज्या अर्थी इतके विक्रमी मताधिक्य दिले, त्या अर्थी नवे सरकार नक्कीच जबाबदारीने काम करेल, असा विश्वास बाळगायला हरकत नाही. ऊतणार नाही, मातणार नाही, घेतला वसा टाकणार नाही, अशाच पद्धतीने या सरकारला काम करावे लागेल. तथापि, विरोधकांनीही आपली जबाबदारी चोखपणे पार पाडणे, हे त्यांचे कर्तव्य ठरते. विरोधी आमदारांमध्ये सध्या केवळ ५० एक आमदारांचा समावेश आहे. ही संख्या कमी असेलही. परंतु, म्हणून विरोधकांचे महत्त्व कमी होते, असे नव्हे. विरोधाला विरोध न करता धोरणीपणाने विरोधकांनी काम पहायला हवे. जनहित हा उद्देश डोळ्यासमोर ठेऊन संबंधित विधेयकाला पाठिंबा द्यायचा की विरोध करायचा, हे ठरवावे. वास्तविक, हार आणि जीत हा निवडणुकीच्या राजकारणाचा एक भागच मानला जातो. चढ आणि उतार हे कुठल्याही पक्षाला कधी चुकलेले नाहीत. एकेकाळी भाजपच्या खासदारांची संख्या केवळ दोन इतकी होती. त्याच भाजपाने संसदेत बहुमत मिळवतानाच देशभर हातपाय पसरले. आज संपूर्ण देशात भाजपाची निर्विवाद सत्ता आहे. म्हणूनच त्यापासून इतर पक्षांनी बोध घ्यायला हवा. लोकांमध्ये जावे, त्यांचे प्रश्न हाती घ्यावेत. त्यातूनच जनाधार वाढू शकतो, हे लक्षात ठेवावे.

या निवडणुकीत महाराष्ट्रात काँग्रेसची अवस्था सर्वात वाईट झाली. लोकसभेतील यशाने हुरळून गेलेला हा पक्ष विधानसभेत अगदीच गाफील राहिला. नाना पटोले यांच्यासारख्या नेत्याच्या हाती प्रदेशाध्यक्षपद देणे पक्षाला भोवले, असे म्हणता येईल. या पक्षाच्या अनेक दिग्गज नेत्यांचा निवडणुकीत पराभव झाला. आता तरी नवे नेतृत्व तयार करण्यावर पक्षाने भर दिला पाहिजे. बंटी पाटील यांच्यासारख्या नेत्याकडे राज्याच्या नेतृत्वाची कमान दिली, तर आगामी काळात नक्कीच पक्षाकरिता अनुकूल वातावरण तयार होऊ शकते. या निवडणुकीत शरद पवार गटाने खुल्या आयात धोरणावर भर दिला. बाहेरच्या पक्षातून दाखल झालेल्या नेत्यांना लगोलग उमेदवारीचे बक्षिस देऊन टाकले. हा निर्णय पक्षाकरिता मारक ठरला, असे म्हणता येईल. त्याचबरोबर एकट्या शरद पवारांना किती फिरवायचे, त्यांच्यावर किती भिस्त ठेवायची, याचा विचार या पक्षाने केला पाहिजे. पवारांचे वय लक्षात घेता सुप्रिया सुळे व अन्य नेत्यांना आता नेतृत्व हातात घेऊन जनतेपुढे जावे लागेल. ठाकरेसेनेला चुकीच्या उमेदवारीचा अनेक ठिकाणी फटका बसला. पाटण, सांगोला यांसारख्या जागांवर पक्षाने सामंजस्य दाखवायला हवे होते. लोकसभेतही सांगलीच्या जागेबाबत पक्षाने दाखवलेला अट्टहास सर्वांनी पाहिला. या चुका सुधारल्या पाहिजेत. त्याचबरोबर संजय राऊत यांच्या बेलगाम बोलण्यावरही पक्षाने नियंत्रण ठेवणे आवश्यक ठरते. इतक्या सगळ्या वाताहतीत मुंबईतील काही जागा पक्षाच्या पदरात पडल्या, यावरून ठाकरेंना मानणारा वर्ग आहे, हे लक्षात येते. उद्धव ठाकरे यांच्यापुढे प्रकृतीच्या समस्या आहेत. त्यामुळे पुन्हा सेनेला उसळी मारायची असेल, तर आदित्य ठाकरे यांनी पुढे आले पाहिजे. केवळ मुंबईपुरते सीमित न राहता महाराष्ट्राचा कानाकोपरा त्यांना पिंजून काढावा लागेल. तशी सर्वच पक्षांमध्ये तऊण नेतृत्वाची वानवा दिसते. तुलनेत ठाकरेसेनेकडे आदित्य आणि वऊण सरदेसाई, राष्ट्रवादी शरद पवार गटाकडे रोहित पवार, रोहित पाटील असे आश्वासक चेहरे दिसतात. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका आता तोंडावर आहेत. या निवडणुकांमध्ये आपली ताकद दाखवण्याची संधी या तऊण नेतृत्वाकडे असेल. मात्र, त्याकरिता कठोर मेहनत आणि जिद्द ठेवावी लागेल. म्हणूनच केवळ भाषणबाजीत न रमता लोकांमध्ये गेले पाहिजे. सखोल अभ्यास करतानाच भूमिका घेण्याची तयारी ठेवायला हवी. आजचा सक्षम विरोधी पक्ष हा उद्याचा सक्षम सत्ताधारी पक्ष असतो. हे लक्षात घेऊन विरेधकांनी आपली भूमिका प्रामाणिकपणे पार पाडावी.

# आ.सुरेश धसांच्या विजयासाठी झटणारे अनिलशेठ काथवटे, माऊली जरांगे

पाटोदा । प्रतिनिधी

**आष्टी मतदारसंघात सुरेश धस यांच्या विजयाची जल्लोषात मिरवणुक काढण्यात आली.या विजयाचे श्रेय हे मतदारसंघातील तमाम मतदारांचे आहे.मात्र या विजयासाठी मतदारसंघातील कार्यकर्ते अहोरात्र मेहनत घेत होते.त्यातच आण्णाची सावली म्हणुन ज्यांचेकडे पाहीले जाते असे डोंगरकिन्ही येथिल युवा कार्यकर्ते अनिलशेठ काथवटे व जि प सदस्य माऊली जरांगे यांना ओळखले जाते.**





सुरेश धस यांनी आपल्या बीड जिल्हा परिषदेच्या उपाध्यक्ष कार्यकाळापासुन असे तळागाळातील निष्ठावंत कार्यकर्ते निर्माण केले.अगदी गरीबातील गरीब कार्यकर्ता पदाधिकारी केला.सर्वसामान्य कार्यकर्त्यांना मान प्रतिष्ठा मिळवून दिली.मतदारसंघातील वाड्या वस्तीवरील लोकांना नावानिशी ओळखणारे एकमेव सुरेश धस हे महाराष्ट्रातील पहिले नेते आहेत.कोणत्या गावात काय समस्या आहेत त्या सोडवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणारे आमदार म्हणुन सुरेश धस यांच्या कडे पाहीले जाते.त्यांच्या राजकिय आयुष्यात जे संवैधानिक पदे मिळाली त्या संधीचं सोनं केलं.प्रत्येक वेळी निष्ठावंत कार्यकर्ते निर्माण करुन जुळवून ठेवले...असेच एक सर्वसामान्य कार्यकर्ता अनिल शेठ काथवटे हे डोंगरकिन्ही येथे मेडिकल दुकान चालवणारा कार्यकर्ते सुरेश धस यांच्या प्रभावाखाली येऊन कार्यकर्ते झाले.असेच कुसळंब येथे साधा हॉटेल चालक माऊली जरांगे यांना राजनैतिक संरक्षण देऊन प्रतिष्ठा मिळवून दिली.अनिल शेठ काथवटे हे सुरेश धस यांच्या नेतृत्वाखाली काम करत असताना त्यांना सर्वस्वी दैवत माणणारे कार्यकर्ते आहेत.आ सुरेश धस यांच्या शब्दासाठी रात्रंदिवस मेहनत घेणारा हा अवलिया कार्यकर्ते आहेत.दिलेल्या कोणत्याही कामाला न्याय देणारा म्हणुन त्यांच्या वर विश्वास आहे.आ सुरेश धस यांच्या कोणत्याही निवडणुकीत अनिल शेठ काथवटे व माऊली जरांगे यांची यंत्रणा म्हणजे कशाचीही उणीव न ठेवता मेहनत घेतली जाते.आण्णा सत्तेत असु वा नसो त्यांच्या बंगल्यासमोरील गर्दी हटतच नाही.पराभवानंतर भाजपाकडुन विधानपरिषदेची उमेदवारी मिळाली व अनिल शेठ काथवटे व माऊली जरांगे हे दोन कार्यकर्ते तीन महिलने घरापासुन फक्त आण्णा च्या विजयासाठी धाराशिव व लातुर जिल्ह्यात तळ ठोकुन होते. भाजपाचे संकटमोचक म्हणुन गिरीश महाजन यांना राजनैतिक अनुभव आहे.त्याच धर्तीवर अनिलशेठ काथवटे माऊली जरांगे हे काम करणारे कार्यकर्ते आहेत.

# पत्रकार परिषदेतील एकनाथ शिंदे यांचे पाच महत्वाचे विधान

मुंबई : आम्ही नाराज होऊन रडणारे नाही तर लढणारे आहोत. आम्ही लढून काम करणारे आहोत. एवढा मोठा विजय ऐतिहासिक आहे. याचे कारण जीव तोडून मेहनत घेतली, निर्णय घेतले. आम्ही घरी बसलो नाही. आम्ही मनापासून काम केले. मी शेवटपर्यंत महाराष्ट्राच्या जनतेसाठी काम करणार आहे. मला काय मिळालं यापेक्षा जनतेला काय मिळाले हे महत्त्वाचे आहे.

लाडक्या बहिणींचा लाडका भाऊ अशी माझी ओळख निर्माण झाली. सर्व बहिणींनी लक्षात ठेवलं. लाडका भाऊ ही नवी ओळख मला सर्वात मोठी वाटते.

मी काल पंतप्रधान नरेंद्र मोदींना फोन केला होता. सरकार बनवताना, निर्णय घेताना माझ्यामुळे अडचण होईल असे मनात आणू नका. तुम्ही आम्हाला मदत केली. अडीच वर्षं तुम्ही राज्याचा विकास करण्याची, उद्योगधंदे आणण्याची संधी दिली आहे. तुम्ही निर्णय घ्या. तुमचा निर्णय महायुती, एनडीएचे प्रमुख म्हणून जसा भाजपासाठी अंतिम असतो तसा आम्हालाही अंतिम आहे.

तुम्ही निर्णय घेताना एकनाथ शिंदेंची अडचण आहे असे मनात आणू नका, मी अमित शाह यांनाही फोन करुन भावना सांगितल्या. जो काही निर्णय असेल तो मान्य असेल.

मी स्व:तला मुख्यमंत्री न समजता सामान्य व्यक्ती म्हणून काम केले. यामुळे मला कोणताही अडथळा येत नव्हता. सर्वसामान्यांसाठी महाराष्ट्राच्या सरकारच्या माध्यमातून काहीतरी केले पाहिजे असे मी ठरवले होते. महायुती सरकारच्या माध्यमातून मी सर्वांसाठी काम केले.

# नागराज मंजुळे यांचा आज ‘महात्मा फुले समता’ पुरस्काराने होणार गौरव!

आष्टी । प्रतिनिधी

**अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्यावतीने दरवर्षी क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या स्मृतीदिनी छगनराव भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली दिला जाणारा 'समता पुरस्कार' यंदा प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक,अभिनेते व लेखक नागराज मंजुळे यांना देण्यात येणार आहे.या पुरस्कारामध्ये १ लक्ष रुपये,फुले पगडी, मानपत्र,शाल आणि स्मृतीचिन्ह यांचा समावेश आहे.आज गुरुवार दि.२८ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता पुण्यातील समता भूमी,फुलेवाडा येथील कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.या सोहळ्यासाठी सामाजिक व राजकीय क्षेत्रातील विविध मान्यवर,समता परिषदेचे पदाधिकारी व राज्यभरातून समता सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.**



या गौरव सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन अ.भा.म. फुले समता परिषदेचे आष्टीचे तालुकाध्यक्ष दत्ताभाऊ बोडखे यांनी केले. सामाजिक,राजकीय, साहित्य, पत्रकारिता अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केलेल्या व्यक्तींना आपल्या अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्यावतीने समता पुरस्कार देण्यात येतो.आजवर अनेक दिग्गजांचा या पुरस्काराने गौरव करण्यात आलेला आहे.यंदाच्या वर्षी या पुरस्कारासाठी नागराज मंजुळे यांची निवड करण्यात आली आहे. त्यांचे नाव मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीत अग्रक्रमाने घेतले जाते. दिग्दर्शक,अभिनेते,निर्माते,पटकथा लेखक,कवी अशा विविध भूमिका लिलया बजावणाऱ्या मंजुळे यांनी अनेक सरस कलाकृती भारतीय चित्रपटसृष्टीला दिल्या आहेत.त्यांनी आपल्या कार्यातून महात्मा जोतीराव फुले, सावित्रीबाई फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांचा सामाजिक वारसा देखील पुढे नेला.त्यांच्या या अलौकिक कार्याची दखल घेत अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने सन २०२४ चा मानाचा 'समता पुरस्कार' देऊन त्यांना गौरविण्यात येत आहे. फुलेप्रेमी नागरिक,समता सैनिक यांनी मोठ्या संख्येने कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन अ.भा.म.फुले समता परिषदेचे तालुकाध्यक्ष दत्ताभाऊ बोडखे यांनी केले आहे.

# महायुतीत कसलेही मतभेद नाहीत–फडणवीस

## मुख्यमंत्री पदाबाबतही मोठे विधान; पक्षश्रेष्ठीच निर्णय घेणार

मुंबई । प्रतिनिधी

**एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रीपदाचा दावा सोडल्याने महाराष्ट्राच्या राजकारणाला नवीन वळण आले आहे. त्यांच्या या निर्णयाचे भाजप नेत्यांनी स्वागत केले आहे. देवेंद्र फडणवीस यांनी आमच्यात कोणतेही मतभेद नाहीत असे स्पष्ट केले असून, पुढील निर्णय पक्षश्रेष्ठींशी चर्चा करून घेतला जाणार असल्याचे सांगितले. यानंतर आता मुख्यमंत्रीपदाबाबतचा निर्णय उद्या दिल्लीत होण्याची शक्यता आहे.**



महाराष्ट्राचे काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मुख्यमंत्रीपदाचा दावा सोडला आहे. एकनाथ शिंदे यांनी आज पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका मांडली. यावेळी त्यांनी आपण नाराज नसल्याचंदेखील स्पष्ट केलं. भाजपचे केंद्रीय नेतृत्व जो निर्णय घेईल, ते आपल्याला मान्य असल्याचं एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केलं. एकनाथ शिंदे यांच्या या पत्रकार परिषदेनंतर भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी तातडीची पत्रकार परिषद घेतली. त्यांनी एकनाथ शिंदे यांच्या भूमिकेचं स्वागत करत त्यांचं कौतुक केलं. तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख नेते अजित पवार यांची देखील प्रतिक्रिया समोर आली. अजित पवार यांनीदेखील एकनाथ शिंदे यांच्या भूमिकेचं स्वागत केलं.

### देवेंद्र फडणवीस काय म्हणाले?

आमच्या महायुतीत कुठलेही मतभेद नाहीत. आम्ही निवडणुकीच्या पूर्वीदेखील सांगितले होते. सर्व निर्णय सोबत घेऊन होतील. आमचे पक्षश्रेष्ठी आहेत, ते आमच्यासोबत बसून सर्व निर्णय घेतील. त्याप्रमाणेच सर्व निर्णय होणार आहेत. त्यामुळे मला असं वाटतं की, कुणाच्या मनात काही किंतू-परंतू असतील तर एकनाथ शिंदे यांनी दूर केलेला आहे, अशी प्रतिक्रिया देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

### आणि फडणवीसांनी हात जोडले

यावेळी देवेंद्र फडणवीस यांना पत्रकारांनी महत्त्वाचा प्रश्न विचारला. भाजपच्या कार्यकर्त्यांची देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्री व्हावी, अशी मागणी आहे. त्यावर काय सांगाल, तुम्ही मुख्यमंत्री होणार का? असा प्रश्न देवेंद्र फडणवीस यांना विचारण्यात आला. त्यावर त्यांनी फार काही न बोलता थेट हात जोडले आणि त्यावर काहीच न बोलणे पसंत केले. तसेच आता आमच्या पक्षश्रेष्ठींसोबत आमची बैठक होईल, असं ते पुढच्या प्रश्नाला उत्तर देताना म्हणाले.

तसेच मुख्यमंत्रीपदाबाबत उद्या दिल्लीत निर्णय होणार असल्याचं स्पष्ट केलं. यानंतर आता भाजपचे महाराष्ट्रातील प्रमुख नेते देवेंद्र फडणवीस यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली.

# मधुमेह : एक गंभीर आरोग्य समस्या...

**२०१३ पर्यंत सुमारे ३८ कोटी लोकांना मधुमेहाने ग्रासले आहे. हा आकडा २०३० पर्यंत दुप्पट होण्याचा इशारा इंटरनॅशनल डायबिटीस फेडरेशने दिला आहे. , जागतिक मधुमेह दिनाच्या निमित्ताने नामांकित मधुमेह तज्ञ डॉ अतुल शिंदे यांचा विशेष लेख अंबाजोगाई मधुमेहाचे प्रमाण जगात झपाट्याने वाढत आहे. ही संपूर्ण जगापुढील एक गंभीर समस्या बनली आहे. इंटरनॅशनल डायबिटीस फेडरेशनच्या आकडेवारीनुसार २०१३ पर्यंत सुमारे ३८ कोटी लोकांना मधुमेहाने ग्रासले आहे. हा आकडा २०३० पर्यंत दुप्पट होण्याचा इशारा इंटरनॅशनल डायबिटीस फेडरेशने दिला आहे.**

जगात सर्वात जास्त मधुमेही भारतात आहेत. म्हणून भारताला मधुमेहाची राजधानी म्हणून संबोधले जात आहे. सध्या सहा कोटी पेक्षा जास्त भारतीयांना मधुमेहाने ग्रासले आहे ,दर दहा सेकंदाला एक नवीन मधुमेहिचे जगात निदान होत आहे. जवळजवळ १९ हजार नवे मधुमेहांचे एका दिवसात निदान होत आहे ,दर ३० सेकंदास मधुमेहामुळे पाय कापण्याची शस्त्रक्रिया केली जाते. दर दहा सेकंदास एका मधुमेहिचा मृत्यू होतो दरवर्षी जवळपास दहा लाख मृत्यू मधुमेहाच्या दुष्परिणामुळे होतात. मधुमेहाचे प्रमाण झपाट्याने वाढण्याचे महत्त्वाचे कारण चुकीची जीवनशैली व अनुवंशिकता अशी आहे. आपल्या भारतीयांच्या रक्तामध्ये मुळातच जीवनशैलीमध्ये आजच्या पिढीत असलेल्या व्यामांचा अभाव, बैठे काम, चुकीच्या आहार पद्धती, धूम्रपान, मद्यपान, मांसाहार इत्यादी तसेच प्रचंड मानसिक आणि शारीरिक ताण तणाव यामुळे वाढणारा लठ्ठपणा हे घटक मधुमेहास कारणीभूत आहेत. मधुमेह म्हणजे फक्त साखर वाढणे किंवा सौम्य आजार नसून त्यामुळे आपोआप होणारे दुर्गामी दुष्परिणाम आणि त्यामुळे होणारा प्रचंड खर्च तसेच कुटुंब आणि समाज यावर पडणारा ताण आपण जाणून घेण्याची गरज आहे. मधुमेह टाळण्यासाठी तीन माध्यमांचा प्रामुख्याने वापर करणे गरजेचे आहे. १) मधुमेह होऊच नये यासाठीप्रयत्न करणे, २) मधुमेह झालाच तर लवकरात लवकर त्याचे निदान करणे. ३)लवकरात लवकर निदान न करता आल्यास योग्य ते उपचार करून भविष्यात होणारे दुष्परिणाम टाळणे. मधुमेह झालेल्या रुग्णांनी दररोज कमीत कमी ४५ मिनिटे व्यायाम करणे आवश्यक आहे. संतुलित आहार घेणे गरजेचे आहे. तेलकट, तळलेले, मसालेदार पदार्थ, फास्ट फूड याचे प्रमाण कमी करून संतुलित आहार घेणे अत्यंत आवश्यक आहे जेवणाच्या नियमित वेळा पाळणे आवश्यक आहे. पालेभाज्या, मोड आलेले कडधान्य, सॅलड या घटक पदार्थाचा वापर हितावह आहे. ताण-तणाव कमी करणे, आजच्या धकाधकीच्या जीवनात मानसिक व शारीरिक ताण तणाव प्रचंड वाढत आहे, त्याचे परिणाम कमी वयामध्ये मधुमेह रक्तदाब, हृदयविकार इत्यादी आजारात होत आहे, योगा, प्राणायाम यासारख्या माध्यमांचा वापर करून दैनंदिन जीवनातील ताण कमी करता येऊ शकतो. मधुमेहाचे जनक डॉक्टर जॉसलिन यांनी म्हटले आहे की, जो मधुमेही व्यक्ती मधुमेहाबद्दल जास्तीत जास्त ज्ञान संपादन करेल तो जास्तीत जास्त वर्ष जगेल. यासाठी डॉक्टरांनी रुग्णांना मधुमेह व त्यांचे दुष्परिणाम याबद्दल सखोल माहिती देणे आवश्यक आहे. तसेच मधुमेही रुग्णांनी मधुमेहावरील विविध पुस्तके, शिबिर, प्रदर्शन इत्यादी माध्यमांचा वापर मधुमेहातील ज्ञान संपादन करण्यासाठी करावा.



**डॉ.अतुल म. शिंदे**
**(मधुमेहतज्ञ) संचालक योगेश्वरी डायबिटीज केअर सेंटर, अंबाजोगाई**

## पान १ वरून...

### नैसर्गिक शेतीसाठी

राज्याचा वाटा हा ८९७ कोटी रुपये इतका आहे. देशभरात नैसर्गिक शेतीला मिशन मोडमध्ये प्रोत्साहन देण्यासाठी, भारत सरकारने कृषी आणि कृषक कल्याण मंत्रालया अंतर्गत केंद्र प्रायोजित स्वतंत्र योजना म्हणून नॅशनल मिशन ऑन नॅचरल फार्मिंगची (एनएमएनएफ) सुरुवात केली आहे. सर्वांना सुरक्षित आणि पौष्टिक अन्न मिळावे, यासाठी नैसर्गिक शेतीच्या पद्धतींना प्रोत्साहन देणे, हे एनएमएनएफ चे उद्दिष्ट आहे. यामुळे शेतकऱ्यांना लागवडीचा खर्च कमी होण्यास मदत होणार आहे.

------

### शिंदेंनी दावा सोडला; महाराष्ट्रात

आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे मुख्यमंत्रिपदाबाबत जो निर्णय घेतील तो आपल्याला मान्य असेल असे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. एकनाथ शिंदे यांच्या या भूमिकेनंतर आता देवेंद्र फडणवीस यांच्या मुख्यमंत्रिपदाचा मार्ग मोकळा झाल्याचे बोलले जात आहे. मात्र मध्य प्रदेश आणि राजस्थानमध्ये निवडणुकीत स्पष्ट बहुमत मिळाल्यावर मोदी-शहा यांनी जो प्रयोग केला त्याच प्रयोगाची महाराष्ट्रात सुध्दा जोरदार चर्चा आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी नविन चेहरा विराजमान झाला तर नवल वाटायला नको. महायुतीचे तीनही नेते गुरुवारी दिल्लीला जाणार असून मोदी आणि शहा यांच्याबरोबर त्यांची बैठक होऊन मुख्यमंत्री पदाच्या नावावर शिक्कामोर्तब होणार आहे.

------------

### शिंदे सरकारमधील या मंत्र्यांना

अजित पवार, छगन भुजबळ, धनंजय मुंडे, अदिती तटकरे, अनिल पाटील, हसन मुश्रीफ, धर्मराव बाबा अत्राम भाजपकडून देवेंद्र फडणवीस, गिरीश महाजन, पंकजा मुंडे, रविंद्र चव्हाण, मंगलप्रभात लोढा, चंद्रशेखर बावनकुळे, आशिष शेलार, नितेश राणे, शिवेंद्रसिंहराजे भोसले, राहुल कुल, माधुरी मिसाळ, संजय कुटे, राधाकृष्ण विखे पाटील, गणेश नाईक, गोपीचंद पडळकर आणि शिंदे शिवसेनेकडून एकनाथ शिंदे, उदय सामंत, शंभूराज देसाई, गुलाबराव पाटील, संजय शिरसाट, भरत गोगावले, प्रकाश सुर्वे, प्रताप सरनाईक, तानाजी सावंत, राजेश क्षीरसागर, आशिष जैस्वाल, निलेश राणे यांना संधी दिली जाण्याची शक्यता असून शिंदे सरकारमधील काही जणांचा डच्चू मिळणार असल्याचे बोलले जात आहे. भाजपकडून विजयकुमार गावित आणि सुधीर मुनगंटीवार यांना वगळले जावू शकते. मुनगंटीवार यांना पक्ष संघटनात्मक कार्याची जबाबदारी दिली जावू शकते.

------------

### गेवराई पंचायत समितीच्या बीडीओ

एम.एस.कांबळे यांनी पुन्हा गेवराई पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी पदाचा पदभार स्विकारला आहे. श्रीमती कांबळे मॅडम यांनी यापूर्वी गेवराई पंचायत समितीत बीडीओ म्हणून चांगले काम पाहिलेले आहे. दरम्यान आगामी काळात पंचायत समिती स्तरावरील सर्वसामान्य नागरिकांचे कामे करण्यावर भर असल्याचेही यावेळी बोलताना त्यांनी सांगितले.

----------

### खा.बजरंग सोनवणेंनी

डी व ५४८ सीवरील प्रमुख शहरांच्या भोवती नवीन बाह्य वळण रस्ता (बायपास) मंजूर करणे, बीड शहरासाठी (राष्ट्रीय महामार्ग - ५२) च्या जंक्शनपासून पालवण, तळेगाव, वासनवाडी, रामनगरपर्यंतचा बायपास रस्ता मंजूर करणे, (रा.मा. - १६) पिठ्ठी पिंपळगाव धस - गारमाथा - डोंगरकिन्ही - अंमळनेर - धामनगांव-टाकळी काझी पर्यंतचा रस्ता राष्ट्रीय महामार्गात समाविष्ट करणे, बीड शहरालगतच्या राष्ट्रीय महामार्गाच्या वळण रस्त्यालगत सर्व्हिस रोड आणि कामास मंजुरी मिळवणे या रस्ता विकासांसंदर्भात चर्चा केली आहे. तसेच याचे निवेदनही देण्यात आले. ही कामे मंजूर झाल्यास बीड जिल्ह्याच्या विकासाला अधिक गती मिळेल आणि नागरिकांना चांगल्या सुविधा उपलब्ध होतील, त्यामुळे या विकास कामांना मंजूरी द्यावी, अशी विनंती खा. सोनवणे यांनी गडकरी यांच्याकडे केली.

cmyk

अ

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

गुरुवार दि. २८ नोव्हेंबर २०२४



## भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने संविधान दिन साजरा

**माजलगाव । प्रतिनिधी**

भारतीय बौद्ध महासभा तालुका माजलगाव च्या वतीन सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प येथे भारतीय संविधान दिन साजरा करण्यात आला या कारयक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे हे तर प्रमुख मार्गदर्शक म्हणुन भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा संस्कार उपाध्यक्ष आद.एस बी मोरे हे होते तर या कार्यक्रमाचे प्रस्ताविक भारतीय बौद्ध महासभेचे ता संस्कार उपाध्यक्ष गुलाब धाईजे यांनी केले तर या प्रसंगी भारतीय बौद्ध महासभेच्या केंद्रियशिक्षिका लिलाताई उजगरे ,सुजाता टाकणखार यांनी मार्गदर्शन केले या प्रसंगी एस बी मोरे यांनी भारतीय संविधान या विषयी सकोल आसे मार्गदर्शन केले या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन भारतीय बौद्ध महासभेचे तालुका सरचिटणीस सिद्धार्थ वक्ते यांनी केले तर आभार बौद्धाचार्य डी पी पोटभरे आप्पा यांनी मानले भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करुण शरणतय घेऊन कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला या कार्यक्रमा साठी भारतीय बौद्ध महासभेच्या शहर अध्यक्षा वंदनाताई घनघाव, भारतीय बौद्ध महासभा ता संरक्षण उपाध्यक्ष नितिन डोंगरे, गुलाब प्रधान,एस एस गायसमुद्रे , दयानंद मोरे,डी पी वाघमारे नाना,शारदाताई तांगडे, वैशाली गायकवाड,राजेभाऊ साळवे, गौतम सरपाते सह भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी व धम्म उपासक उपासिका उपस्थित होते.

# कविता म्हणजे अस्तित्वाचे गाणे, या जगास पाहण्यास दृष्टी देणे या कविता तुमच्या आमच्या जगण्याचे लेणे आहे

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**कै. यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहाच्या उद्घाटन सोहळ्या नंतर कवितेचा जागर झाला. गुलाबी थंडीत रसिकांच्या प्रचंड प्रतिसादाने रंगलेल्या या कवि संमेलनात शेतकऱ्यांची वेदना, दुःख, राजकीय विडंबन, समाजाचे वास्तव चित्र शब्दातून बांधणाऱ्या कवितांनी या ४० व्या स्मृती समारोहातील कवि संमेलनातील सादर झालेल्या कविताला व कविता रसिकांनी डोक्यावरच घेतले. यंदाच्या कवि संमेलानाच्या अध्यक्षस्थानी ठाणे येथील जेष्ठ कवियत्री डॉ. प्रज्ञा दया पवार हे होते. या कवि संमेलनात वसईच्या प्रा. सिसिलिया कार्व्हालो, पुण्याचे संगिता बर्वे, छत्रपती संभाजीनगरचे नारायण पूरी, सांगलीचे रमजान मुल्ला, वर्धा (अंबाजोगाईचे) बालाजी सुतार, उमरगाचे बालाजी मदन इंगळे, बेळगांवची कवियत्री पूजा भडांगे, यवतमाळचे जयंत चावरे, नाशिकचे संजय चौधरी, शेगावचे नितीन वरणकर, अकोलाचे गोपाळ मापरी व परळीचे संजय आघाव या कविचा सहभाग होता. या कवि संमेलनाचे बहारदार सुत्रसंचालन अकोल्याचे कवि गोपाळ मापरी यांनी केले. काळजाचा डाव घेणाऱ्या कविचे, राजकीय व्यंग कविता सादर करण्यात आल्या.**

कवि संमेलनाचा प्रारंभ कवि संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. प्रज्ञा पवार यांच्या ''जिंदगी जानलेना'' ही कविता खाणीत काम करणाऱ्या कामगाराच्या जीवन प्रसंग किती धोकादायक असते याची जाणीव करून देणारी भावपूर्ण कविता सादर केली. त्यानंतर उमरगा येथील कवि बालाजी इंगळे यांनी मी तुझी आठवण काढील व तमाम कविनो चला कामास लागू या ही कविता सादर केली. पुणे येथील सुमिती लिमये यांनी स्त्रीवादी कविता सादर करून स्त्रीयामध्ये जागृती आणण्याचा प्रयत्न केला. कवितेत म्हणतात लोक पोहरात आली चैत्र येथे साजरे सणवार केले. मोगऱ्याने मोठे उपकार केले. यवतमाळचे जयंत चावरे यांनी वऱ्हाडी भाषेत ''मायमाऊली'' या कवितेत आईचे नीरगस किती महत्त्व पूर्ण स्थान असते याचे दर्शन कवितेतुन मांडुन रसिकांची मन जिंकली. त्याचबरोबर दुसरी कविता ''आजी'' या कवितेते आजी व नातू यांचे भावपूर्ण संबंधाचे वर्णन करताना कवि म्हणतात.




**यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहातील कवि संमेलनास रसिकांचा प्रचंड प्रतिसाद–**

आजी म्हणते,

तुझ्या विना मुक घर व सुन्न झाले आंगण
वाढवू नको तुझ्या माझ्यात दरी
तुझ्या आठवणी जपून ठेवल्या बाळा
येना धावत बाळा आजीकडे
तुझी भेट माझ्यासाठी पंढरीची वारी

अशा भावना प्रबाध कवितेला रसिकांनी डोक्यावर घेतले. बेळगावच्या पूजा भडंगे, सांगलीचे रमजान मुल्ला, वर्धा अंबाजोगाईचे कवि बालाजी सुतार, शेगावचे नितीन वरणकर, परळी–वैजनाथचे संजय आघाव, पुण्याचे संगिता बर्वे, वसईच्या प्रा. सिसिलिया कार्व्हालो, अकोलाचे गोपाळ मापरी या कविंनी शेतकऱ्यांच्या जीवनाचे वास्तव दर्शन करून देणाऱ्या ऱ्हदयस्पर्शी कविता सादर केल्या. सध्या राजकीय परिस्थिती व राजकीय पक्षाचे विडंबन करणाऱ्या कवितेलाही प्रेक्षकांकडुन प्रतिसाद मिळाला. अशा बहारदार कविसंमेलनाचे प्रास्ताविक समारोह समितीचे सदस्य प्रा. भगवान शिंदे यांनी केले. सर्व कविचे स्वागत सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देवून समितीचे सचिव दगडू लोमटे यांनी केले. कवि संमेलनास रसिक प्रेक्षकांनी प्रचंड गर्दी केली होती. गुलाबी थंडीत हे रंगलेले कवि संमेलन ठरले.

# रामभाऊ लांडे यांची ग्रंथ संकलन समितीवर निवड



अंबड । प्रतिनिधी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावर आधारित पुस्तकाच्या संकलनाकरीता स्थापन करण्यात आलेल्या समितीवर होळकरशाहीचे अभ्यासक रामभाऊ लांडे यांची पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.प्रकाश महानवर व अध्यासन संचालक डॉ.प्रभाकर कोळेकर यांनी नियुक्ती केली.सन २०२४-२०२५ हे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंतीचे वर्षे असुन संबंध देशभर विविध उपक्रमातून अहिल्यादेवींचा इतिहास व जीवनचरित्र सर्व घटकापर्यंत पोहचविण्याचे कार्य केंद्र व राज्य सरकार तसेच विविध शैक्षणिक संस्था, संशोधन मंडळ आदी करीत आहेत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने देखील २०२५ या वर्षात अहिल्यादेवींच्या जीवनचरित्राचा चित्ररथ,स्मारक ग्रंथ, व्याख्याने,ऐतिहासिक सहल आदी उपक्रम आयोजित केले आहेत. रामभाऊ लांडे यांच्या नियुक्तीबद्दल अभिनंदन करण्यात येत आहे.

# घाटनांदुर येथे हज़रत टिपू सुल्तान यांची जंयती साजरी

**घाटनांदुर । प्रतिनिधी**

अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदुर येथे हजरत टिपू सुलतान प्रतिष्ठान यांच्या वतीने दिनांक २७ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वा हजरत टिपू सुलतान यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करून सर्व मान्यवरांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले हजरत टिपू सुलतान प्रतिष्ठान यांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या रक्तदान शिबिरामध्ये ४१ रक्तदात्यांनी रक्तदान केले यावेळी सरपंच महेश अप्पा गारठे ,युवा नेते गणेश भैया देशमुख, रामभाऊ वैद्य, दत्ता जाधव, ज्ञानोबा जाधव,महेबुब शेख, दादा वैद्य,प्रदिप वैद्य, अध्यक्ष अयाज शेख, इरफान कुरेशी, मुर्तुजा शेख, इलाही शेख, प्रमोद महाजन, पत्रकार परमेश्वर वैद्य, सलमान कुरेश,बालाजी मिसाळ, केशव गाडवे, सुरज ताटे ,शाहबाज शेख, वाजिद शेख, गणेश कुसळे, आवेज शेख इतर मान्यवर व हजरत टिपू सुलतान प्रतिष्ठानचे सर्व सदस्य उपस्थित होते.




# तेजज्ञान फाऊंडेशनच्या ध्यान महोत्सवाची उत्साहात सांगता

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

तेजज्ञान फाऊंडेशनच्या रजत जयंती ध्यान महोत्सवचे आयोजन शहरातील लोकनेते गोपिनाथराव मुंडे सभागृह, खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई येथे करण्यात आले होते. या महोत्सवाची उत्साहात सांगता झाली.

हॅपी थॉट्स नांवाने ओळखली जाणारी तेजज्ञान ग्लोबल फाऊंडेशन ही आध्यात्मिक सेवाभावी संस्था आपल्या स्थापना दिनाच्या रौप्य महोत्सवी वर्षात प्रवेश करीत आहे. या विशेष प्रसंगी, फाऊंडेशन तर्फे रविवारी शहरातील लोकनेते गोपिनाथराव मुंडे सभागृह, खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई येथे रजत जयंती ध्यान महोत्सव (सिल्व्हर ज्युबिली सेलिब्रेशन) आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध डॉ.शंकर धपाटे (अधिष्ठाता, स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तथा रूग्णालय), अविनाश भारती (प्रसिद्ध व्याख्याते, युवा कवी तथा किर्तनकार) आणि प्रमुख वक्त्या म्हणून डॉ.वनिता उन्हाळे मॅडम या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी कार्यक्रमाच्या सुरूवातीस बोलताना धनंजय इंगळे यांनी तेजज्ञान फाऊंडेशनचे संस्थापक तेजगुरू सरश्री यांचा आणि त्यांच्या आध्यात्मिक कार्याचा परिचय करून देत केली. त्यांनी उपस्थितांना तेजज्ञान फाऊंडेशनच्या जागतिक शांततेसाठीच्या कटिबद्धतेचा उल्लेख करत, बाहेरच्या जगतात शांतता प्रस्थापित करण्यासाठी प्रथम अंतर्मनात शांतता निर्माण करणे आवश्यक आहे, असे समजावले. जीवनात 'स्वल्पविराम' घेण्याचे महत्व पटवून देत, ''हातातील मोबाइल काही वेळ बाजूला ठेवून ध्यानात बसल्यास, ध्यानाद्वारे आयुष्यात हा स्वल्पविराम निर्माण होईल आणि आपल्या सर्वोच्च आनंदाचा, 'स्व–अनुभव' होईल,'' असे इंगळे म्हणाले. तर प्रमुख वक्त्या म्हणून डॉ.वनिता उन्हाळे मॅडम यांनी तेजज्ञान फाऊंडेशनचे संस्थापक तेजगुरू सरश्री यांनी जीवनात ध्यान व आध्यात्मिक साधनेचे महत्त्व पटवून देत लाखो लोकांच्या जीवनात आनंद आणि शांती निर्माण केली आहे असे सांगून तेजज्ञान फाऊंडेशन तर्फे आयोजित या ध्यान महोत्सवाच्या माध्यमातून जगभर शांतता आणि आनंद पसरविण्याच्या उद्दिष्टाला एक नवीन दिशा देण्यात आली असल्याचे उन्हाळे मॅडम यांनी सांगितले. या प्रसंगी डॉ.शंकर धपाटे आणि अविनाश भारती यांनी ही तेजज्ञान फाऊंडेशनच्या वतीने रजत जयंती ध्यान महोत्सवचे उत्तम आयोजन केल्याबद्दल कौतुक केले. तसेच त्यांनी आपल्या विचारांतून उपस्थितांना संबोधित केले आणि साधनेसाठी प्रेरणा दिली. या कार्यक्रमात तेजगुरू सरश्री यांचा ध्यानावर मार्गदर्शन करणारा व्हिडिओ संदेश दाखविण्यात आला. सरश्रींनी यात ध्यान का आणि कसे करावे, तसेच ध्यानाचे वरवरचे तसेच अंतिम लाभ म्हणजे 'मी कोण आहे?' या प्रश्नाचे उत्तर शोधणे, यावर प्रकाश टाकला. ''मी कोण आहे ?'' हा शोध घेणे मानवी जीवनाचे अंतिम उद्दिष्ट असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी सर्व उपस्थितांना २१ मिनिटांचे ध्यान अनुभवण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले, ज्यातून उपस्थितांना 'स्व–अनुभव' मिळाला. या कार्यक्रमाला १०० पेक्षा अधिक साधक आणि नागरिक सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनंजय इंगळे यांनी रंगतदार पद्धतीने केले आणि फाउंडेशनच्या २५ वर्षांच्या प्रवासाची ओळख उपस्थित श्रोत्यांना करून दिली. कार्यक्रमाच्या समारोपात, जवळपास सर्व उपस्थितांनी २१ दिवसांचे ध्यान चॅलेंज घेण्याचा संकल्प व्यक्त केला. तेजज्ञान फाउंडेशन तर्फे अशा प्रकारचे कार्यक्रम भारतातील सुमारे १२५ शहरांमध्ये आयोजित करण्यात आले आहेत, ज्यामुळे संपूर्ण देशभर ध्यानाच्या माध्यमातून शांतता आणि आनंदाचे सशक्त वातावरण निर्माण होत आहे हे उल्लेखनीय आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी तेजज्ञान फाऊंडेशन, शाखा अंबाजोगाईच्या वतीने पुढाकार घेण्यात आला.




पान ६ वरून...

## पक्षश्रेष्ठींनी पकंजाताई मुंडे

भाजप महायुतीच्या मंत्रिमंडळामध्ये आ. पंकजाताई मुंडे यांना कॅबिनेट मंत्रीपदी त्यांची वर्णी लागावी अशी मागणी बीड जिल्हा भरातील तमाम मायबाप जनतेकडून होत आहे आणि निश्चितच केंद्रीय पार्लमेंटरी बोर्ड भारतीय जनता पक्षातील वरिष्ठ नेते गण माननीय अमित भाई शहा माननीय पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी भाजपचे महाराष्ट्रातील लोकप्रिय नेते देवेंद्रजी फडणवीस या मागणीची दखल घेऊन पंकजाताई मुंडे यांना कॅबिनेट मंत्रीपदी शपथ देतील असा विश्वास बीड जिल्ह्यातील जनता व्यक्त करत आहे लोकनेते गोपीनाथ मुंडे साहेब यांचे महाराष्ट्र भारतीय जनता पार्टीतील योगदान लक्षात घेऊन त्यामध्ये लोकनेते गोपीनाथ मुंडे साहेबांचा आणीबाणीतील १९७२ च्या काळातील जेलमधील संघर्ष असेल, तसेच गाव खेड्यातील वाडी वस्तीवर महाराष्ट्रातील काना कोपऱ्यात कमळाचे रोपटे लावले आज त्या रोपट्याचा वटवृक्ष होताना दिसत आहे हे लोकनेते गोपीनाथ मुंडे साहेब आणि भाजपचे प्रमोद महाजन यांचे योगदान भारतीय जनता पक्ष विसरणार नाही त्यामुळे निश्चितच आमदार पंकजाताई मुंडे यांची महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्रीपदी वर्णी लावावी अशी मागणी भाजपचे जिल्हा सरचिटणीस एडवोकेट सुधीर घुमरे यांनी पत्रकार द्वारे केली आहे

## अंबाजोगाईत मधुमेहावरील

शिबीरातील मोफत तपासण्या–:

वजन व उंची, रक्तदाब, रक्तशर्करा, तीन महिन्यांची साखरेची सरासरी, किडनीची तपासणी, रक्तातील चरबी,शरीरातील चरबी,पायांच्या नसांची तपासणी,ई.सी.जी., थायरॉइड तपासणी व युरीन तपासणी अश्या विविध प्रकारच्या तपासण्या केल्या जाणार आहेत.

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर २०२४/ ७८५
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- १३/११/२०२४

**नाव बदलण्याचा जाहिरनामा**

अर्जदार श्री. सौ. श्रीमती: प्रतीक भैय्यासाहेब हातोटे २ पद्मजा भैय्यासाहेब हातोटे

प्रकरण : सर्वे नं ४०/१ मधील प्लॉट नं. ३५ सिटी सर्वे नं.१८६३/३५ मधील न. प. मि. नं १८-८१-३५ हस्तांतरण करने बाबत

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प. मालमत्ता घर क्र. (३५) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व - प्लॉट नं ३४ व कॉलनी अंतर्गत रस्ता
पश्चिम :- सर्वे नं.३४ चा भाग
दक्षिण सर्वे नं.३७ चा भाग
उत्तर:- कॉलनी अंतर्गत रस्ता

**स्वाक्षरित**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर २०२४/ ७९५
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- २५/११/२०२४

**नाव बदलण्याचा जाहिरनामा**

अर्जदार श्री. सौ. श्रीमती: सलमान याकुब शेख व इतर

प्रकरण : प्लॉट नं.२१० न.प.मि.नं.१८-६०-२१०/३ चे वारसाने करणेबाबत

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प. मालमत्ता घर क्र.(२१०) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व - निळकंठ सुरंगे यांचा प्लॉट
पश्चिम :- कॉलनी अंतर्गत रस्ता
दक्षिण निळकंठ सुरंगे यांचा प्लॉट
उत्तर:- नाथभजन यांचा
याच प्लॉटमधील भाग

**स्वाक्षरित**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर २०२४/ ७६६
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- ०५/११/२०२४

**नाव बदलण्याचा जाहिरनामा**

अर्जदार श्री. सौ. श्रीमती: लक्ष्मण बाबुराव शिंदे २) वैशाली लक्ष्मण शिंदे

प्रकरण : सर्वे नं.११ प्लॉट नं.२१ सिटी सर्वे नं.१८७१/ब/२१ न.प.मि.नं.१८-१४९-२१/२ चे हस्तांतरण करणेबाबत

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प. मालमत्ता घर क्र.(२१) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व - प्लॉट नं.२०
पश्चिम :- प्लॉट नं.२१ मधील रोहाऊस क्र.१
दक्षिण सर्वे नं.११ मधील भाग
उत्तर:- ९ मीटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता

**स्वाक्षरित**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**

पान ६ वरून...

## मराठवाडा साहित्य परिषदेच्या

नाट्य परिषदेच्या अध्यक्ष अशा अनेक जबाबदार्या आहेत. नाट्य, संगीत, साहित्याची आवड असल्याने या विविध क्षेत्रात काम करण्यास त्या उत्सुक असतात. मराठवाडा साहित्य परिषदेच्या अनेक समित्या स्थापन झाल्या असून यात ग्रंथ पुरस्कार निवड समिती, नाट्य समिती, आभ्यासमंडळे आदिवासी कोळी व लोकसाहित्य संशोधन समिती, कार्यक्रम समिती, ग्रामीण शब्दकोष समिती, संपादक मंडळ, ग्रंथ प्रकाशन समिती, मराठवाडा लेखिका साहित्य समिती, बालकुमार साहित्य उपक्रम समिती, परिक्षा समिती, वक्तृत्व स्पर्धा, ग्रंथालय समिती आदि समितीत संपूर्ण मराठवाडयातील साहित्यकांची नेमणूक करण्यात आली आहे. प्रमुख पदाधिकार्यांच्या समितीत प्राचार्य डॉ.दीपाताई क्षीरसागर यांची सहकार्यवाह पदी निवड झाल्याबद्दल त्यांचे मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष कौतुकराव ठाले पाटील, आसाराम लोमटे, रामचंद्र तिरूके, रामचंद्र साळूंके, दादा गोरे, गणेश मोहिते, आतकरे,डॉ.विद्यासागर पाटांगणकर, प्रभाकर साळेगावकर, सतिश साळुंके, स्नेहल पाठक, दगडू लोमटे, डी.एस.कुलकर्णी, अनंत कराड, संजय पाटील देवळाणकर, बालासाहेब कटारे, रामनाथ वाढे आदींनी अभिनंदन केले आहे.

## माळी समाजाच्या नेहमी

महायुतीच्या सरकार काळात विविध विकासकामे करून आष्टी पाटोदा मतदारसंघात आपली वेगळीच छाप निर्माण केली आहे तीच महाराष्ट्र राज्यात छाप पडावी म्हणून महायुती सरकार मधील पक्षश्रेष्ठींनी आमदार सुरेश आण्णा धस यांना महाराष्ट्र राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी मंत्री मंडळात संधी देऊन महाराष्ट्र राज्यातील जनतेच्या मनातील खरा मंत्री म्हणून संधी द्यावी अशी मागणी पाटोदा नगरपंचायतचे सभापती रामेश्वर गोरे,निरगुडी गावचे माजी सरपंच हानुमान भैय्या शेलार, माळी महासंघाचे तालुका अध्यक्ष गणेश शेवाळे यांनी केली आहे.

## सोयाबीन पाठोपाठ कापूस

मध्ये डीएपीची बॅग ५६० रुपया मध्ये मिळायचीती आता १४०० रुपयाची झाली. त्यावेळी कापूस वेचणी ३ प्रतिकिलोती आता ८ ते १० प्रति किलो मजुरी शेतकऱ्यांना द्यावी लागत आहे. एकंदरीत शेतकऱ्यांच्या मालाला हमीभावाचे आश्वासन केवळ कागदापूर्तीच मर्यादित असल्याचे आरोपही वाकसे यांनी केले आहे.

## पुणे मुंबई साठी ज्यादा

बीड जिल्ह्यातून मुंबई आणि पुणे प्रवासासाठी मोठ्या प्रमाणात प्रवासी जातात. बीड येथून जवळपास दहा खाजगी वाहने पुणे आणि मुंबईसाठी जातात . राज्य परिवहन मंडळाच्या बस मात्र एक- एकच जाते .याही बस वेळेवर जात नाहीत. गाड्यांची स्थिती चांगली नसते .त्यामुळे प्रवाशांची अडचण होते. आता प्रत्येक जिल्ह्यासाठी ई- बसेस आल्या आहेत .त्यामुळे आता पुण्यासाठी रात्री १०,१०.३० आणि १२ वाजता अशा तीन गाड्या सोडाव्यात तसेच मुंबईसाठी रात्री ८,८.३०व ९ वाजता बसेस सोडाव्यात आणि या सर्व ई-बसेस असाव्यात अशी मागणी परिषदेच्या वतीने करण्यात आली. याशिवाय कोल्हापूर आणि नागपूर या लांब पल्ल्याच्या गाड्याही ई-बसेस असाव्यात अशी मागणी परिषदेच्या वतीने विभागीय नियंत्रक श्रीमती अ.सं.दुसाणे यांच्याकडे करण्यात आली .यावेळी विभागीय नियंत्रक श्रीमती दुसाने यांनी पुण्यासाठी प्रत्येक एक तासाला गाडी सोडली जाईल मात्र आपल्याकडे अपुऱ्या बस असल्याने सध्या बस सोडणे शक्य नाही.मात्र नवीन गाडी आल्यानंतर प्रत्येक तासाला पुण्यासाठी गाडी असेल मुंबईसाठी ही बस सोडण्यात येतील. ही व्यवस्था लवकरच होईल याशिवाय कोल्हापूर आणि नागपूर साठीही ई- बसेस सोडण्यात येतील असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. यामधून एसटी महामंडळाचा महसूलही वाढणार असून प्रवाशांची सोय होणार आहे .आरामदायी प्रवासासाठी ई-बसेस अधिक उपयोगी असल्याचे प्रवाशांचे मत आहे. प्रवाशांच्या सोयीसाठी मराठी पत्रकार परिषदेने विभागीय नियंत्रकांना निवेदन देऊन ही मागणी केली होती .याला सकारात्मक प्रतिसाद देत श्रीमती अ.सं.दुसाणे यांनी पुरेशा गाड्या सोडल्या जातील असे आश्वासन दिले .यावेळी श्रीमती दुसाने यांना दिलेल्या निवेदनावर मराठी पत्रकार परिषदेचे संभाजीनगर विभागीय समन्वयक सुभाष चौरे ,राज्य कार्यकारणी सदस्य विलास डोळसे ,जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, हल्ला विरोधी कृती समितीचे समन्वयक अभिमान्यु घरत, संपादक राजेंद्र होळकर,जिल्हा प्रसिध्दी प्रमुख संजय हांगे,बीड तालुका निमंत्रक तथा संपादक मंगेश नेटुरकर,समन्वयक लक्ष्मण नरनाळे,तालुका कार्याध्यक्ष रेहान शेख , तालुका अध्यक्ष दत्ता आजबे, कोषाध्यक्ष प्रशांत लहुरीकर, तालुका सरचिटणीस प्रचंड सोळंके यांच्या सह्या आहेत.

## धनगर समाजाला एसटी

आरोप केला होता. यावर धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या आरक्षणाचा लाभ देण्यासाठी शिंदे सरकारने सकारात्मक प्रतिसाद दिला होता. त्यामुळे महायुती सरकारने दिलेला शब्द पाळून धनगर समाजाच्या एसटी आरक्षणाची अंमलबजावणी करीत आरक्षणाचा तिढा संपवावा. अशी मागणी धनगर समाजाचे नेते चंद्रकांत हजारे यांनी केली आहे. आश्वासनाची अंमलबजावणी केली नाही तर पुन्हा आंदोलन करण्याचा इशारा ही हजारे यांनी दिला आहे.

धनगर समाजाच्या आरक्षणाचा मुद्दा मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. यावर राज्यात अनेक ठिकाणी आंदोलने, उपोषणे करण्यात आली. यात धनगड जमातीच्या एका कुटुंबातील सहा जणांचे धनगड जमातीचे प्रमाणपत्र रद्द करण्याची मागणी केली होती. यावर राज्य सरकारने ही मागणी पूर्ण करून धनगड जमातीचे प्रमाणपत्र रद्द केले. याबाबत अधिक माहिती देताना धनगर समाजाचे नेते चंद्रकांत हजारे यांनी सांगितले की, धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या आरक्षणाचा लाभ मिळावा, या प्रामुख मागणीला घेऊन मी व माझ्या सहकाऱ्यांनी मागील चार महिन्यांपूर्वी लातूर येथे उपोषण, विविध आंदोलने झाली. समाज बांधवांनी संविधानामध्ये अनुसूचित जमातीच्या सूचित धनगर जमात समाविष्ट असल्याचे सांगून अंमलबजावणी केली जात नसल्याचा आरोप केला होता. यावर धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या आरक्षणाचा लाभ देण्यासाठी शिंदे-फडणवीस-पवार यांच्या सरकारने सकारात्मक प्रतिसाद दिला होता. त्यामुळे आता महायुती सरकारने आम्हाला दिलेला शब्द पाळून धनगर समाजाच्या एसटी आरक्षणाची तात्काळ अंमलबजावणी करून आरक्षणाचा तिढा संपवावा. कारण, धनगर समाजाच्या आरक्षणाचा मुद्दा गेली अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. यावर राज्यात अनेक ठिकाणी आंदोलन व उपोषण करण्यात आली. यात धनगड जमातीच्या एका कुटुंबातील सहा जणांचे धनगड जमातीचे प्रमाणपत्र रद्द करण्याची मागणी केली होती. यावर राज्य सरकारने ही मागणी पूर्ण करुन धनगड जमातीचे प्रमाणपत्र रद्द ही केले. पुढे आरक्षणाच्या अंमलबजावणीचा मुद्दा उपस्थित झाला असून विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागल्याने तो तसाच राहिला. आता निवडणुका झाल्या आहेत. त्यामुळे धनगर समाजाच्या अनुसूचित जमातीच्या आरक्षणाची मागणी आम्ही पुन्हा करीत आहोत. असे हजारे यांनी सांगितले.

अन्यथा धनगर समाज पुन्हा आंदोलन करणार :

राज्यात धनगर समाजाच्या अनुसूचित जमातीच्या आरक्षणाची मागणी ही गेली काही महिन्यांपासून जोर धरून होती. त्यामुळे राज्यातील महायुतीच्या सरकारने मागणी संदर्भात सकारात्मक असल्याचे सांगितले. याप्रश्नी दोन वेळा मंत्रालयात बैठका ही झाल्या. त्यात आचारसंहिता लागली. त्यामुळे आरक्षणाचा मुद्दा पुढे ढकलण्यात आला. त्यामुळे धनगर समाजाने आरक्षण मिळावे यासाठी राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार आणले आहे. त्यामुळे सरकारने समाजाला दिलेला शब्द पाळावा, अन्यथा धनगर समाज पुन्हा रस्त्यावर येऊन आंदोलन करण्यासाठी तयार आहे याची नोंद घ्यावी.

- चंद्रकांत हजारे (धनगर समाजाचे नेते)

## बाल विवाह थांबण्यासाठी

बाल विवाह प्रतिबंधक शपथ घेण्यात आली.

बाल विवाह प्रतिबंधक प्रतिज्ञावाल विवाह हे एक सामाजिक दुष्कृत्य आहे आणि कायद्याचे उल्लंघन आहे ज्यामुळे मुलींचे शिक्षण, संरक्षण आरोग्य आणि विकास, त्यांचे स्वप्नपूर्ती मध्ये अडथळे येतात.महणून मी प्रतिज्ञा घेतो/घेते आहेमी बालविवाह विरुद्ध सर्वतोपरी प्रयत्न करेन.मी सदैव सुनिश्चित करेन की माझ्या कुटुंबात, शेजारी व समाजात बालविवाह होणार नाही तिचे काळजी घेणार.बाल विवाहाच्या कोणत्याही प्रयत्याची तक्रार मी पंचायत आणि सरकारी अधिकारी यांना देईन.सर्व मुलाच्या शिक्षण आणि सुरक्षिततेसाठी मी माझा आवाज उठवेन आणि मी बाल विवाह मुक्त काढण्यासाठी प्रयत्न करणार आहे.

cmyk

# कांद्याच्या दरावर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्र सरकारचा प्लॅन

सध्या हळूहळू कांद्याच्या दरात वाढ होताना दिसत आहे. याचा शेतकऱ्यांना चांगला फायदा मिळत आहे. मात्र, दुसऱ्या बाजूला कांद्याचे दर वाढल्यानं खिशाला झळ बसत असल्याचे ग्राहक म्हणत आहेत. अशातच वाढत्या कांद्याच्या दरावर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारनं प्लॅन केला आहे. ग्राहकांना स्वस्त दरात कांदा उपलब्ध व्हावा, यासाठी केंद्र सरकारच्या पुढाकारातून केवळ ३५ रुपये किलो दराने कांदा विकला जात आहे.

सध्या देशात थंडीच्या हंगाम सुरु झाला आहे. त्यामुळं या काळात मुबलक प्रमाणात कांदा उपलब्ध होत नसल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. त्यामुळं कांद्याचे दर हे प्रतिकिलो ५० रुपये तर काही ठिकाणी ६० रुपये किलोपर्यंत पोहोटले आहेत. अशा परिस्थितीत सरकारने सर्वसामान्यांसाठी स्वस्त कांद्याची व्यवस्था करण्यासाठी पावले उचलली आहेत. ग्राहकांना स्वस्त दरात कांदा उपलब्ध व्हावा, यासाठी केंद्र सरकारच्या पुढाकारातून केवळ ३५ रुपये किलो दराने कांदा विकला जात आहे. या उपक्रमांतर्गत, सध्या प्रामुख्याने उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये कांद्यासाठी भाजीपाला व्हॅन पुरवल्या जात आहेत.



उत्तर प्रदेशातीलवाराणसीमधील सोनभद्र, मिर्झापूर यासह अनेक ठिकाणी ३५ रुपये किलो दरानं कांदा उपलब्ध होत आहे. वाराणसीमध्ये २५ ठिकाणी ३५ रुपये किलो दरानं कांद्याची विक्री सुरु आहे. कमी दरानं कादा उपलब्ध होत असल्यानं ग्राहकांना चांगलाच दिलासा मिळाला आहे. कांद्याचे दर नियंत्रीत राहावेत म्हणून सरकार सातत्यानं काही ना काही उपाययोजना राबवत असेत. जेणेकरुन ग्राहकांचा रोष सरकारवर येणार नाही. दरम्यान, निवडणुकीच्या काळात कांद्याच्या धोरणाचा मोठा फटका सरकारला बसला होता.

### कांद्याचे दर वाढतात त्यावेळीच सरकारचा हस्तक्षेप होतो

दरम्यान, एका बाजूला सरकारकडून कमी दरानं कांद्याची विक्री होत असली तरी दुसऱ्या बाजूला शेतकऱ्यांना फटका बसत असल्याचं काही शेतकऱ्यांचं म्हणणं आहे. ज्यावेळी आमच्या कांद्याचे दर वाढतात त्यावेळी सरकार हस्तक्षेप करते आणि शेतकऱ्यांच्या कांद्याचा दर कसा पडेल यासाठी प्लॅन आखते असे काही शेतकऱ्यांनी सांगितले आहे. मात्र, ज्यावेळी शेतकऱ्यांच्या कांद्याचे दर पडत असतात, त्यावेळी मात्र, सरकार कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करत नसल्याची काही शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

## डाळींबाची कोणती जात शेतकऱ्यांसाठी उपयुक्त



सध्या डाळींब शेतीला चांगले दिवस आले आहेत. यामुळे शेतकऱ्यांना चार पैसे मिळू लागले आहेत. यासाठी योग्य जात महत्वाची आहे. लागवडीमध्ये उच्च उत्पादनासाठी आपण ज्या जातींची लागवड करतो ते अतिशय महत्त्वाच्या असतात.

१) गणेश: या प्रकारच्या डाळिंबाचे फळ आकाराने खूप मोठी असते. मोठी, साल लाल आणि पिवळ्या रंगाचे मिश्रण असते. बिया मऊ गुलाबी असतात. ही महाराष्ट्रातील व्यावसायिक शेती आहे. एका झाडापासून सरासरी उत्पादन ८ ते १० किलो असते. ही जात १९३६ मध्ये विकसित करण्यात आली. १९७० मध्ये त्याचे नाव ॲलन डी वरून बदलून गणेश असे करण्यात आले. या जातीच्या एका फळाचे वजन २०० ते ३०० ग्रॅम असते. गोड, रसाळ आणि जेवणात रुचकर, त्याच्या दाण्यांचा रंग हलका गुलाबी असतो. एका झाडाला ८ ते १२ किलो फळ मिळते .

२) कमान : हे फळ गणेश जाती पेक्षा लहान असून मऊ बिया असलेले गडद लाल आहे. ३) मऊ : बिया गडद लाल आहेत त्यात मुख्यत: गणेश प्रकाराचा समावेश आहे. ४) बहर : सरासरी प्रत्येक फळांचे वजन सुमारे २५० ते ३०० ग्रॅम असते. ५) मस्कत : या प्रजातीच्या फळांमध्ये गुलाबी बिया असतात. ज्यांचा वरचा भाग लाल असतो. फळांचे वजन सरासरी ३०० ते ३५० ग्रॅम असते. ६) ज्योतिष : हा प्रकार आयआयएचआर, बेंगलोरने विकसित केला आहे. फळे मोठी, चमकदार रंगाची असतात. आणि बिया जास्त रसाने मऊ असतात. या प्रकारची फळे दुष्काळ सहन करतात कारण ती झाडांच्या फांद्यामध्ये असतात. ७) रुबी :हे प्रजाती देखील आयआयएचआरने बंगळुरूमध्ये विकसित केले आहे. साल लालसर तपकिरी असते.आणि हिरव्या रेषा लाल असतात. फळांचे वजन २७० ग्रॅम आहे आणि सरासरी उत्पादन १६ ते १८ टन प्रति हेक्टर आहे. ८) ढोलका : फळे आकाराने खूप मोठी आहेत आणि विशेषत: गुजरातमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढतात.

## संत्रा कलमांची निवड कशी करावी?

संत्रा कलमांची लागवड पावसाळा सुरू होताना करणे उत्तम असते. एक पाऊस पडून गेल्यानंतर आणि पुढे ढगाळ हवामानाचा काळ सुरू झाल्यानंतर संत्रा कलमांची लागवड करावी.पावसाळा संपताना किंवा संपून गेल्यानंतर लागवड करणे टाळावे. त्या दृष्टीने मध्य जुलैपर्यंतचा काळ लागवडीसाठी चांगला असतो.योग्य खुंट व योग्य प्रकारचा डोळा यांच्या खात्रीसाठी कलमे कृषी विद्यापीठ, शासकीय परवानाधारक रोपवाटिकेतूनच घ्याव्यात, कलमे निरोगी, जास्त उत्पादन व दर्जेदार फळे देणाऱ्या मातृ वृक्षाचे डोळे वापरूनच तयार केलेली असावीत, संत्र्याच्या कलमा किकरपानी, वेलिया किंवा पानसोट असलेल्या मातृ वृक्षापासून तयार केलेली नसावीत, कलमांची निवड करताना संत्र्याचा डोळा कोणत्या खुंटावर बांधलेला आहे हे पाहावे. कारण खुंटाचा, झाडाची शारीरिक वाढ, फळधारणाशक्ती, फळांचे गुणधर्म आणि झाडाचे आयुष्य यावर परिणाम पडत असतो,कलमे रोगप्रतिकारक्षम खुंटावर तयार केलेली असावीत, हलक्या व मध्यम जमिनीसाठी जंबेरी तर भारी



जमिनीसाठी रंगपूर लिंबू या खुंटावरील कलमांची निवड करावी, जबेरी किंवा रंगपूर लिंबू या खुंटावर २५ ते ३० सेंमी उंचीवर बांधलेल्या कलमा निवडाव्यात. कमी उंचीवर बांधणी केलेल्या कलमा मातीच्या आणि पाण्याच्या संपर्कात येऊन बुरशीजन्य रोगास बळी पडतात, कलमांचे फाटे परिपक्व झालेले असणे आवश्यक आहे. फाट्यावर पांढऱ्या बारीक रेषा असल्या तर फाटे परिपक्व झाले असे समजावे, साधारण ४५ ते ६० सेंमीपर्यंत सरळ वाढलेल्या कलमा चांगल्या असतात. अति उंच कलमा लागवडीसाठी वापरू नयेत. त्या कलमा वेलीया प्रकारच्या असण्याची शक्यता असते, कलमांवर पाने पोखरणारी किंवा पाने खाणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव नसावा. तसेच कलम रोगमुक्त असावे, जुन्या झालेल्या खुंटावरील कलमे लागवडीस योग्य नसतात. साधारणतः एक वर्षे वयाची कलम लागवडीसाठी निवडावी, कलमांना भरपूर मुळे (जाळवा) असावीत. कलमांच्या खोडावर इतर फूट नसावी, डोळ्यांचा सांधा चांगला भरलेला, जखम व व्रणरहित असावा.

# द्राक्ष उत्पादनात प्रकाशाची भूमिका

सूर्यप्रकाशाची गुणवत्ता विशेषत: त्याची तीव्रता आणि वर्णपट (स्पेक्ट्रम) हे द्राक्षाच्या वाढीमध्ये आणि बेरीच्या गुणवत्तेत महत्त्वाची भूमिका बजावते. त्याचा द्राक्षांमधील साखर आणि आम्लतेच्या संतुलनावरही परिणाम होतो. अपरिपक्व द्राक्षांमध्ये आढळणाऱ्या प्रमुख मॅलिक ॲसिडचे उत्पादनास सूर्यप्रकाश उत्तेजित करतो. जसजशी द्राक्षे पिकत जातात आणि अधिक सूर्यप्रकाश मिळत जातो, तसतसे मॅलिक ॲसिडचे हळूहळू टार्टरिक आम्लामध्ये रूपांतर होते. त्यामुळे आम्लता वाढते. द्राक्ष वेलींचा वाढीचा वेग हा आपल्या हवामानामध्ये ८००ते १२०० पीपीएफडी प्रकाशाच्या तीव्रतेमध्ये राहतो. प्रामुख्याने 'थॉमसन सीडलेस' या वाणामध्ये २५ पीपीएफडी प्रकाशाची तीव्रता प्रकाश भरपाई बिंदू म्हणून ओळखली जाते. (पीपीएफडी : पानावर पडणाऱ्या प्रकाश संश्लेषणयोग्य अशा फोटॉनची संख्या प्रति सेकंद प्रति वर्गमीटर कॅनॉपी.) दाट कॅनॉपीमध्ये पुरेसा सूर्यप्रकाश आत पोहोचत नाही. अशा सावलीतील पानांमधील प्रकाश संश्लेषणाचा दर हा २५ ते ५० टक्क्यांनी कमी असल्याचे अभ्यासात आढळले आहे. पानांची कार्यक्षमता वाढवण्यासाठी वेलीचे कॅनॉपी व्यवस्थापन योग्य पद्धतीने करणे आवश्यक आहे.

सूर्यप्रकाश आणि वातावरण परस्पर संबंध –

प्रकाश, तापमान आणि आर्द्रता हे वातावरणातील घटक द्राक्षाच्या शरीरशास्त्रीय हालचालींवर प्रभाव टाकतात. मुख्य शरीरशास्त्रीय हालचालींपैकी तापमानातील फरकांमुळे थेट प्रभावित होणारी प्रकाश संश्लेषण ही पहिली प्रक्रिया आहे. जेव्हा तापमान अनुकूल मर्यादेपेक्षा जास्त वाढते किंवा कमी होते, तेव्हा द्राक्ष वाणांमध्ये खालील लक्षणे दिसतात.

प्रकाश संश्लेषण क्रियेसाठी २५ ते ३५ अंश सेल्सिअस दरम्यान तापमान अनुकूल मानले जाते. जेव्हा तापमान १० अंशांपेक्षा खाली जाते, तेव्हा बहुतेक शरीरशास्त्रीय हालचालींचा वेग मंदावतो. कमी तापमानामुळे सामान्यतः बेरीमधील सामू आणि प्रोलिनचे प्रमाण कमी होऊन आम्लतेचे प्रमाण वाढते. ४० अंशांपेक्षा जास्त तापमानात वेलीतील



उष्णतेची अनुकूलता यंत्रणा सक्रिय होते. उच्च तापमान हे अँथोसायनीन संयुगांच्या निर्मितीस प्रतिबंध करते. अँथोसायनीनची रचनासुद्धा बदलू शकते. क्रिमसन सीडलेस जातीमध्ये अनेकदा समाधानकारक लाल रंग न येण्यामध्ये रात्रीच्या उच्च तापमानामुळे अँथोसायनीनचे संचय कमी होणे हे मुख्य कारण दिसते. तसेच साखर जमा होण्यास अडथळा निर्माण होतो. तापमानातील वाढीच्या स्थितीमध्ये परिस्थितीनुसार सिंचनाचे नियोजन करून वातावरणातील तापमानापेक्षा पानांचे तापमान ३ ते ४ अंशांनी कमी करता आल्यास अन्ननिर्मितीचा वेग वाढू शकतो. बहुतांश जाती या प्रकाश आणि तापमानाला वेगवेगळा प्रतिसाद देतात. त्यांच्यातील आनुवंशिक घटक प्रकाशाची तरंग लांबी आणि तापमानातील बदलाप्रमाणे सक्रिय किंवा निष्क्रिय होतात. प्रकाश पानांद्वारे शोषून घेण्यासाठी वेलींच्या पानांत ७५ ते ८० टक्के आर्द्रता आवश्यक असते. अशी आर्द्रता असलेल्या पानांमध्ये रासायनिक प्रक्रिया चांगली होते. द्राक्ष हे ३ प्रजातीतील वेल आहे. द्राक्षाच्या पानांवरील अभ्यासातून असे स्पष्टपणे दिसते, की ४० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त तापमानात प्रकाश संश्लेषणाचा वेग लक्षणीय प्रमाणात कमी होतो. या कमी झालेल्या दरामुळे जैवरासायनिक प्रक्रिया विस्कळीत होतात. पानांतील हरितद्रव्यांचे प्रमाण कमी होऊन पाने पिवळी पडतात. ठरावीक तापमानाच्या वर वेलाची पाने त्यांची पर्णरंध्रे बंद करून बाष्पोत्सर्जन कमी किंवा बंद करतात, त्यामुळे पानांतील पाण्याची अपेक्षित पातळी (टर्गर) टिकून राहते.

तापमानाचा द्राक्ष मण्यावर होणारा परिणाम –

मण्यामध्ये मुख्यतः पाणी, शर्करा, सेंद्रिय आम्ल, नायट्रोजन संयुगे, खनिजे, पेक्टिन्स, फिनोलिक संयुगे आणि सुगंधी संयुगे असे विविध घटक आढळतात. त्यावर कमी जास्त होणाऱ्या तापमानाचा परिणाम होतो. मण्याचे चयापचय सभोवतालच्या तापमानावर अवलंबून असते. तापमानात वाढ झाल्यामुळे आम्लता कमी होते आणि साखरेचे प्रमाण वाढते. त्याचा साखर–आम्ल गुणोत्तरावर देखील परिणाम होतो. उच्च तापमानामुळे मॅलिक ॲसिडचे चयापचय देखील टार्टरिक आम्लापेक्षा वेगाने होते. मॅलेट संचयनासाठी अनुकूल तापमान २० ते २५ अंश सेल्सिअस असून, तापमान ४० अंशांवर गेल्यास त्यात घट दिसून येते. जेव्हा दिवसाचे तापमान तुलनेने जास्त असते, तेव्हा मण्यामधील सामू कमी राखण्यासाठी रात्रीचे तापमान कमी असणे आवश्यक असते. जेव्हा तापमान ३० अंशांपेक्षा जास्त असेल, तेव्हा अँथोसायनिन निर्मितीमध्ये घट दिसून येते.

महत्त्वाच्या बाबी –

रसायनाच्या फवारणीदरम्यान स्टिकर्सचा वापर कमी करावा. म्हणजे पानांच्या पृष्ठभागावर त्यांचा लेप तयार होणार नाही. पानांवर सूर्यप्रकाश व्यवस्थितरीत्या विभागला जाऊन प्रकाशसंश्लेषण क्रिया सुरळीत पार पडेल. पानावर पुरेशा प्रमाणात सूर्यप्रकाश पडल्यामुळे कीड–रोगांचा प्रादुर्भाव तुलनेने कमी होईल. कीड–रोगांच्या प्रादुर्भावामुळे पानांचे क्षेत्रफळ कमी होऊन प्रकाश संश्लेषण क्रियेत अडथळा येऊ शकतो. प्रकाश संश्लेषण क्रिया सुरळीत पार पडण्यासाठी दोन फांद्यामध्ये योग्य अंतर ठेवावे. अतिरिक्त फांद्यांची छाटणी करावी. प्रत्येक फांदीवर फक्त १७ ते १८ पाने ठेवावीत. प्रत्येक भागात सारख्या तरंगलांबीचा सूर्यप्रकाश मिळेल. तसेच फवारणीचे कव्हरेज पूर्ण कॅनॉपीमध्ये होऊ शकेल.

सूर्यप्रकाशाच्या दिशेने असलेल्या कळीमध्ये फळधारणा योग्यप्रकारे होते. योग्य घड निर्मितीसाठी किमान ३० टक्के सूर्यप्रकाश कॅनॉपीमधून जाणे आवश्यक आहे. सावलीमध्ये घड निर्मिती योग्य प्रकारे होत नाही. संजीवकांचा वापर योग्य प्रमाणात करावा. संजीवकांच्या जास्त वापरामुळे पाने कडक होतात आणि फाटतात, त्यामुळे पाने पूर्ण क्षमतेने अन्ननिर्मिती करू शकत नाहीत. काडीवरील प्रत्येक डोळ्यावर एकसारख्या तीव्रतेचा सूर्यप्रकाश मिळाला तरच सूक्ष्मघड निर्मिती होते. दाट कॅनॉपी किंवा ढगाळ वातावरण यामुळे डोळ्यावर सूर्यप्रकाश न मिळाल्यास त्या डोळ्यातील प्रथिनांचे उत्पादन न झाल्याने सूक्ष्मघडाऐवजी त्याचे बाळीमध्ये रूपांतर होते. मंडप पद्धतीमध्ये फांद्या आडव्या वाढत असल्यामुळे सूर्यप्रकाशाची ऊर्जा कमी कार्यक्षमतेने वापरली जाते. त्यात दाट कॅनॉपीमुळे सूर्यप्रकाश पानांच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या थरांना व्यवस्थित मिळत नाही. खालच्या थरातील पाने पोषक घटकांसाठी अन्य पानांवर अवलंबून राहतात. सूर्यप्रकाशाच्या योग्य वापरासाठी ट्रेलीस वळण पद्धतीचा अवलंब करावा.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१५२० : पोर्तुगीज प्रवासी फर्डिनांड मॅगेलन याने प्रशांत महासागराला पार करण्याची सुरुवात केली होती.
१६१२ : गॅलिलिओ गॅलिली याने प्रथमच नेपच्यून या ग्रहाचा शोध लावला. मात्र तेव्हा त्याला तो तारा आहे.
१६६० : मध्ये लंडन ला रॉयल सोसायटीचे गठन झाले होते.
१८१४ : द टाइम्स ऑफ लंदन या वृत्तपत्राला पहिल्यांदा स्वयंचलित प्रिंटींग मशीन ने छापल्या गेले होते.
१८२१ : पनामा ने स्पेन पासून स्वतंत्र होण्याची घोषणा केली.
१८३६ : स्पेनने मेक्सिकोच्या स्वातंत्र्याला मान्यता दिली.
१८८५ : मुंबई येथे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना
१८९३ : न्यूझीलंड मध्ये पहिल्यांदा महिलांनी मतदान केले होते.
१८९५ : ऑगस्टा व लुई या ल्युमियर बंधूंनी पॅरिस येथे चित्रपटाचा जगातील पहिला खेळ सादर केला. या खेळाचे तिकीट होते एक फ्रँक. पहिल्या खेळाचे उत्पन्न आले फक्त ३५ फ्रँक. मात्र नंतर तो खेळ एवढा लोकप्रिय झाला की आठवडाभरातच त्याचे दिवसाला २० खेळ होऊन दिवसाला २००० फ्रँक एवढे भरघोस उत्पन्न मिळू लागले. ल्युमिअर बंधू
१९३८ : प्रभात चा माझा मुलगा हा चित्रपट रिलीज झाला.
१९५६ : मध्ये याच दिवशी चीनचे प्रधानमंत्री चाऊ एन–ली भारताच्या दौर्यावर आले होते.
१९६४ : नासा चे मरीनर–४ हे अंतराळयान मंगळाच्या मोहिमेवर निघाले.
१९७५ : वेस्ट इंडीज चे प्रसिद्ध क्रिकेट खेळाडू मायकेल होल्डिंग यांनी आजच्या दिवशी कसोटी सामन्यात डेब्यू केला होता. त्यांनी ६० कसोटी सामन्यात २४९ विकेट तर १०२ एकदिवसीय सामन्यात १४२ विकेट घेतल्या होत्या.
१९९० : मध्ये जॉन मेजर हे युनायटेड किंगडम चे प्रधानमंत्री बनले होते.
१९९६ : कप्तान इंद्राणी सिंग ऐरबेस ए–३०० विमानाला कमांड देणारी पहिली महिला ठरली.
१९९७ : भारताचे माजी प्रधानमंत्री आय.के.गुजराल यांनी राजीनामा दिला.
१९९९ : पाकिस्तान ला हरवून दक्षिण कोरियाने आशिया विश्वचषक आपल्या नावावर केला होता.
२००० : तेलगू भाषेतील महाकवी गुर्रम जाशुवा यांच्या नावाने दिला जाणारा साहित्य पुरस्कार कवी नारायण सुर्वे यांना जाहीर.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५३ : डॉक्टरेट मिळवणाऱ्या पहिल्या अमेरिकन महिला हेलन व्हाईट यांचा जन्म. (मृत्यू: २८ ऑक्टोबर १९४४)
१८५६ : वूड्रो विल्सन – अमेरिकेचे २८ वे राष्ट्राध्यक्ष आणि नोबेल पारितोषिक विजेते (मृत्यू: ३ फेब्रुवारी १९२४)
१८५७ : स्पेनचा राजा अल्फान्सो (बारावा) यांचा जन्म. (मृत्यू: २५ नोव्हेंबर १८८५)
१८७२ : गायक नट रामकृष्णबुवा वझे यांचा जन्म. (मृत्यू: ५ मे १९४३)
१८९९ : गजानन त्र्यंबक तथा ग. त्र्यं. माडखोलकर – कादंबरीकार, समीक्षक आणि पत्रकार (मृत्यू: २७ नोव्हेंबर १९७६)
१९११ : फणी मुजुमदार – चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व पटकथा लेखक. दूरदर्शनवर लोकप्रिय झालेल्या 'रामायण' या मालिकेची पटकथा त्यांनी लिहिली होती. चित्रपटसृष्टीतील सहा दशकांच्या वाटचालीत त्यांनी केवळ हिन्दीतच नव्हे तर चिनी, बंगाली, मल्याळी, उडिया व इंग्रजी चित्रपटांच्या निर्मितीत मोठे नाव कमावले. (मृत्यू: १६ मे १९९४)
१९२६ : हुतात्मा शिरीषकुमार (मृत्यू: १० ऑगस्ट १९४२)
१९२७ : प्रसिद्ध हाडांचे डॉक्टर प्रमोद करण सेठी यांचा जन्म.
१९३२ : धीरुभाई अंबानी – उद्योगपती (मृत्यू: ६ जुलै २००२)
१९३७ : रतन टाटा – उद्योगपती
१९४० : ए. के. अँटनी – भारताचे परराष्ट्रमंत्री अरुण जेटली केंद्रीय मंत्री व वकीलअरुण जेटली केंद्रीय मंत्री व वकील
१९४५ : वीरेंद्र – नेपाळचे राजे (मृत्यू: १ जून २००१)
१९४५ : हिंदी साहित्यकार तसेच पत्रकार अमर गोस्वामी यांचा जन्म.
१९५२ : अरुण जेटली – केंद्रीय मंत्री व वकील
१९६४ : भारतीय अमेरिकन वकील आणि राजकारणी मायकल बेनेट यांचा जन्म.
१९८७ : अर्जुन पुरस्काराने सन्मानित अभिलाषा म्हात्रे यांचा वाढदिवस.
१९८८ : भारतीय चित्रपट सृष्टीतील अभिनेत्री यामी गौतम यांचा वाढदिवस

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६६३ : फ्रॅन्सेस्को मारिया ग्रिमाल्डी इटालियन गणितज्ञ आणि भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: २ एप्रिल १६१८)
१८९० : महाराष्ट्राचेथोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांचे निधन.
१८९३ : ब्रिटिश अधिकारी सर अलेक्झांडर कनिंगहॅम यांचे निधन. (जन्म: २३ जानेवारी १८१४)
१९३१ : आबालाल रहमान – चित्रकार (जन्म: १८६०)
१९३९ : बास्केटबॉल चे निर्माते जेम्स नेस्मिथ यांचे निधन. (जन्म: ६ नोव्हेंबर १८६१)
१९५४ : भौतिक शास्त्राचे शास्त्रज्ञ एनरिको फर्मी यांचे निधन.
१९६२ : बंगाल चे दृष्टिहीन गायक के.सी.दे यांचे निधन.
१९७७ : सुमित्रानंदन पंत – छायावादी विचारधारेतील हिन्दी कवी (जन्म: २० मे १९००)
१९९४ : चित्रपट सृष्टीचे प्रसिद्ध दिग्दर्शक भालजी पेंढारकर यांचे निधन.
१९८१ : हिन्दी चित्रपटांत चार दशके चरित्र अभिनेत्याच्या भूमिका करणारे डेविड अब्राहम चेऊलकर तथा डेविड यांचे कॅनडातील टोरांटो येथे निधन झाले.
१९८९ : हिंदी भाषेचे कादंबरीकार देवनारायण द्विवेदी यांचे निधन.
२००० : मेघश्याम पुंडलिक तथा मे. पुं. रेगे – तत्त्वचिंतक, मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष (जन्म: २४ जानेवारी १९२४ वेंगुर्ला)
२००१ : नाटक निर्माते अनंत काणे यांचे निधन.
२००६ : प्रभाकर पंडित – संगीतकार व व्हायोलिनवादक (जन्म: ३० सप्टेंबर १९३३)
२००८ : भारतीय हवलदार गजेन्द्र सिंग यांचे निधन.
२००८ : भारतीय सैनिक संदीप उन्नीकृष्णन यांचे निधन. (जन्म: १५ मार्च १९७७)
२०१२ : अमेरिकन लेखक झिग झॅगलर यांचे निधन. (जन्म: ६ नोव्हेंबर १९२६).

# बीडमध्ये रंगणार जिल्हास्तरीय युवा महोत्सव

बीड । प्रतिनिधी

क्रीडा व युवक सेवा संचालनालय व बीड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ०४ ते ०५ डिसेंबर या कालावधीत जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील १५ ते २९ वर्षे वयोगटातील जास्तीत जास्त युवक व युवतींनी यामध्ये सहभागासाठी विहित नमुन्यातील प्रवेश अर्ज ०२ डिसेंबरपर्यंत सायंकाळी पाच वाजेपर्यंत बीड येथील जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल इमारत येथे सादर करून महोत्सवात सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, तालुका क्रीडा अधिकारी पंडित चव्हाण यांनी केले आहे. मुदतीनंतर येणारे व स्पर्धेच्या दिवशी वेळेवर येणारे प्रवेश अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी, असेही त्यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात नमूद केले आहे.

## सहभागासाठी ०२ डिसेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

### युथ आयकॉनसाठी दोन डिसेंबर रोजी दुपारी ३ पर्यंत मुदत

युवक कल्याण क्षेत्रात तसेच युवांना प्रभावित करणारे कार्य केलेले १५ ते २९ वयोगटातील युवा यांनी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड येथे ०२ डिसेंबर रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत माहिती सादर करावी. (युवांनी नाव, पत्ता, इ-मेल आयडी, संपर्क क्रमांक व युवांनी केलेल्या कार्यांची संक्षिप्त माहिती अंदाजित २००० शब्दात द्यावी. ) युथ आयकॉन मधील विजेत्यांना नियमाप्रमाणे देय बक्षीसे असतील.

### अधिक माहितीसाठी येथे साधा संपर्क

युवा महोत्सवात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या जिल्ह्यातील अभियांत्रिकी महाविद्यालये, वैद्यकीय महाविद्यालये, कृषी महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था महाविद्यालये व इतर विद्यालयांनी सहभागासाठी नियम व विहित नमुन्यातील अर्ज आणि अटी व शर्तींच्या माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड येथे कार्यालयीन वेळेत किंवा प्रत्यक्ष उपस्थित राहून किंवा क्रीडा अधिकारी अनिकेत काळे ९६०४९ ५९६७८, कालिदास होसुरकर ९४२१५ ९५५१५, क्रीडा मार्गदर्शक सतिश राठोड ९९२३० १९३५३, अविनाश पाटील ९६२३७ ८११२१, रेवननाथ शेलार ९०७५४ ७६७९१, जितेंद्र आराक ९२२६४ ८१७२८, योगेश करांडे ९९२२९ ९९६७२ यांच्याशी संपर्क साधून जिल्हास्तर युवा महोत्सवाबाबत माहिती घेऊ शकतात.

जिल्हास्तर युवा महोत्सवात संकल्पनांवर आधारित स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम यात समूह लोकनृत्य, लोकगीत, कौशल्य विकास कार्यक्रम यात कथालेखन, चित्रकला, वक्तृत्व स्पर्धा, कविता गायन इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. सांस्कृतिक कार्यक्रमात समूह लोकनृत्य स्पर्धेसाठी विजेत्यास प्रथम सात, द्वितीय पाच तर तृतीय बक्षीस तीन हजार रुपये देण्यात येईल. लोकगीत स्पर्धेसाठी विजेत्यास प्रथम बक्षीस पाच, द्वितीय तीन तर तृतीय दोन हजार ५०० रुपये बक्षीस देण्यात येणार आहेत.

कौशल्य विकास कार्यक्रमात कथालेखन १००० शब्द मर्यादा लेखनासाठी मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेत स्पर्धा होईल. तसेच चित्रकला, हिंदी व इंग्रजी भाषेतील वक्तृत्व स्पर्धा व कविता (होणार आहे. विजेत्यास प्रथम बक्षीस ३ हजार, द्वितीय २ हजार तर तृतीय १ हजार ५०० रुपये बक्षीस देण्यात येईल. त्याचप्रमाणे संकल्पनांवर आधारित स्पर्धा विज्ञान व तंत्रज्ञान यामधील नवसंकल्पना योगदान या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. विजेत्यास प्रथम बक्षीस पाच हजार, द्वितीय बक्षीस तीन हजार, तर तृतीय बक्षीस दोन हजार रुपये देण्यात येणार आहेत. युवा महोत्सवात सहभागासाठी स्पर्धकांचे वय १५ ते २९ वर्षे असे राहील. जन्म तारखेबाबत सबळ पुरावा जोडणे आवश्यक आहे. स्पर्धेसाठी स्पर्धक हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा, स्पर्धकांनी नाव, पत्ता, जन्मतारीख, संपर्क क्र. ईमेल आयडी, व याबाबत सबळ पुरावा सादर करणे आवश्यक आहे. त्याकरिता स्पर्धकांनी विहित नमुन्यात प्रवेश अर्ज व ओळखपत्र ०२ डिसेंबर पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल, सहयोग नगर, जालना रोड, बीड येथे करावेत.

# कुटूंबाच्या प्रगतीसाठी महिलांनी व्यवसायात पुढे यावे - हस्तीमल बंब



जालना। प्रतिनिधी

व्यापारी महासंघ (कॅट) चे नवनिर्वाचित मराठवाडा विभागीय अध्यक्ष हस्तीमलजी बंब यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख पदाधिकार्यांची बैठक २५ नवंबर रोजी श्री बंब यांच्या कार्यालयात घेण्यात आली. प्रारंभी बैठकीचे उद्देश्य व प्रास्ताविक करताना श्री बंब म्हणाले प्रत्येक क्षेत्रात महिलांचे कार्य प्रशंसनीय आहे. पुर्वी संयुक्त परिवार होते सध्या सिमित व लहान परिवार झाले आहे. महागाई सुध्दा वाढत चाललेली आहे. शासकीय किंवा खाजगी नौकरी मिळणे अवघड आहे. पुरुष मंडळी विशेष करून तरुण वर्ग व्यसनाधिनतेचे शिकार होत आहे. म्हणून कुटूंबाच्या उदर निर्वाह व प्रगतीसाठी सुन, मुली, महिला यांनी लहान मोठे उद्योग, गृह उद्योग, व्यवसायात पुढे यावे. सध्याच्या युगात शैक्षणिक, आधुनिक तंत्रज्ञानात महिलांची कामगिरी उत्कृष्ठ आहे.

व्यापारी संघटनेत सुध्दा महिलांना आरक्षण देण्यात आले आहे. संपूर्ण मराठवाड्यात प्रत्येक जिल्ह्यात व्यापारी महासंघात महिला आघाडी करण्याचे उद्दिष्ठ आहे. महिला शाखाचे व्यवसाय क्षेत्रात जालना जिल्ह्याला उत्कृष्ठ कार्या बद्दल राज्यस्तरीय पुरस्कार मिळालेला आहे. म्हणून सौ. मोहिते यांनी उद्योग क्षेत्रात संपूर्ण राज्यात नाव अलौकिक केले आहे. शून्य पासून विश्व निर्माण केले आहे. महिलांनी फक्त चुल-मुल पर्यंत न राहता उद्योग व्यवसायात पुढे यावे. आता महिलांनी अबला नाही सबला म्हणून होणे गरजेचे आहे. सौ. सिता मोहिते यांनी मराठवाडा विभागीय अध्यक्ष पदाची जवाबदारी स्विकारावी असे बंब यांनी सुचविले. उपस्थित सर्वांनी सहमति दिली. सुखदेव बजाज, राम मोहिते, ॲड. सुब्रह्मण्यम अय्यर यांनी आपले विचार मांडले. मराठवाडा विभागीय महिला सचिव पदी सौ. आनंदी अय्यर यांचे नांव सुचविले. सौ. मोहिते, सौ. अय्यर यांना श्री बंब यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन सत्कार करण्यात आले. सत्काराचा उत्तर देतांना सौ. मोहिते म्हणाले संपूर्ण मराठवाड्यात दौरे संपर्क करून महिला संघटना उभारू व लवकरच कार्यकारिणी जाहिर करु. श्री बंब यांनी दिलेली जवाबदारी उत्कृष्ठ रित्या पार पाडू व मिळालेल्या संधीचे सोने करू तसेच सर्वांना सोबत घेऊन संघटना वाढवु असे सौ. मोहिते म्हणाले. बैठकीचे सुत्र संचालन व आभार सहसचिव गोविंद साखला यांनी केले. या निवडीचे जिल्ह्यातून सर्व स्तरावर महिला शाखा वर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# नागसेन ग्रंथालयात संविधान दिन



जालना। प्रतिनिधी

माहिती तंत्रज्ञानाच्या युगात भारताने चंद्रावर पाऊल ठेवले असले तरी आजही बहुतांशी भारतीय नागरिक आपले कर्तव्य, अधिकार, सवलती, सुविधा यापासून अनभिज्ञ आहेत.७५ व्या भारतीय संविधान वर्षात जनजागृती केली जात असून प्रत्येक भारतीय नागरिकाने संविधान साक्षर व्हावे, असे आवाहन भीम उद्योग अभियान चळवळीतील सामाजिक कार्यकर्ते राजेश राऊत यांनी केले.

जूना जालना भागातील नागसेन ग्रंथालयात मंगळवारी ( ता. २६) भारतीय संविधान दिन साजरा करण्यात आला. राजेश राऊत यांनी जात, धर्म, पंथा ऐवजी संवैधानिक कायद्याने देश, राज्याचा कारभार चालला तरच एकता, अखंडता, सामाजिक एकोपा कायम राहून खऱ्या अर्थाने संविधानाची अंमलबजावणी होईल. अशी अपेक्षा व्यक्त केली. प्रारंभी उद्देशिकेचे सामुहिक वाचन करण्यात आले. या वेळी यशवंत राऊत, श्रावण गायकवाड, प्रदीप भालेराव, पिंटू पांडव आदींची उपस्थिती होती.



जालना : बदनापूरचे आमदार नारायण कुचे हे प्रचंड मतांनी निवडून आल्याबद्दल मुंबई येथे त्यांची शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी भेट घेऊन शुभेच्छा दिल्या यावेळी राजेंद्र लाड रामेश्वर दराडे भगवान आंबोरे प्रमोद वाघमारे कैलास चव्हाण यांची उपस्थिती होती

# लिंबागणेश येथील जलजीवन योजनेंतर्गत कामाच्या चौकशीची मागणी

## सीईओ आदित्य जीवने, प्रकल्प संचालक राजेंद्र मोराळे यांना तक्रार



बीड। प्रतिनिधी

ग्रामीण भागातील प्रत्येक घराला दिवसाला ५५ लिटर पाणी मिळावे यासाठी ३ वर्षांपूर्वी केंद्र सरकारने हाती घेतलेल्या महत्वकांक्षी जलजीवन योजनेचा जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने फज्जा उडविला आहे.ही योजना पुर्णत्वाकडे नेण्याची महत्त्वाकांक्षा मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनी हा विषय अजेंड्यावर घेत गावोगावी पाहणी सुरू केली आहे.त्याअनुषंगाने बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील तब्बल पाऊण कोटी रुपयांच्या जलजीवन योजनेंतर्गत मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाला असुन प्रत्यक्षात काम न करताच कागदोपत्रीच कामे झाल्याचे दाखवुन निधी घशात घालण्याचे काम पुढ-यांच्या स्थानिक कार्यकर्ते यांनी केले आहे.याचवेळी दुसरीकडे मात्र ग्रामस्थांचे पाण्यावाचुन हाल होत असुन ग्रामस्थांवर पाणी विकत घेण्याची वेळ आली आहे. संबंधित प्रकरणात सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी आज मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड आदित्य जीवने यांना प्रत्यक्ष भेटून लेखी निवेदनाद्वारे तक्रार केली आहे.याचवेळी प्रकल्प संचालक,जल जीवन मिशन जिल्हा परिषद बीड पदाचा पदभार घेतलेले राजेंद्र मोराळे यांना लेखी तक्रारी द्वारे सखोल चौकशी करून दोषींवर कारवाईची मागणी केली आहे.

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील जलजीवन योजनेंतर्गत अंतर्गत गैरव्यवहार प्रकरणात सखोल चौकशी करून कारवाई करण्यात यावी अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी दि.२०.०५.२०२४ रोजी जिल्हाधिकारी बीड, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांना केल्यानंतर त्या अनुषंगाने शिवकुमार स्वामी अपर जिल्हा दंडाधिकारी बीड यांनी दि.२७.०५.२०२४ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांना सदर निवेदनातील नमुद मुद्यांबाबत आपल्या स्तरावरून तात्काळ चौकशी करून नियमानुसार आवश्यक कार्यवाही करण्याबाबत पत्र दिले होते.परंतु ६ महिने उलटूनही अद्याप चौकशी करून कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. आदित्य जीवने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड जलजीवन योजना पुर्णत्वाकडे नेण्याची महत्त्वाकांक्षा ठेवून असल्याने चौकशी करून कारवाई होईल अशी अपेक्षा डॉ.गणेश ढवळे यांनी व्यक्त केली.

# भारतीय संविधान हे सर्वांचे रक्षण करते-ॲड.तेजस वडमारे



बीड। प्रतिनिधी

बलभीम नगर बुद्ध विहार शिवाजी नगर बीड येथे २६/११/२४ रोजी अंजली विशाल वडमारे, अंजली तेजस वडमारे यांनी संविधान दिना निमित्त कार्यक्रम आयोजित केला होता या कार्यक्रमात निशांत वडमारे, अमित विद्यागार व अधिरा वडमारे यानी संविधान दीना निमित्त थोडक्यत मनोगतव्यक्त केले त्यानंतर ॲड तेजस वडमारे यांनी बोलताना संविधान दिनाचे सविस्तर महत्व सांगून विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दोन वर्ष अकरा महिने अठरा दिवसात जगातील सर्वात मोठे हस्त लिखित संविधन तयार करून आजच्या दिवशी दिले आहे या संविधानाची विशेषता ही आहे की जे लोक संविधान बदलण्यासाठी प्रयत्न करत आहेत त्याची सुद्धा रक्षण हे संविधान करत आह. त्या नंतर त्यानी पुढे बोलताना सांगितले की संविधानाने प्रत्येक माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार दिला आपण संविधानाची उद्देशिका पाहिली तर सर्वप्रथम त्यामध्ये न्याय दिलेला आहे, त्यानंतर स्वातंत्र्य, समानताव बंधुता हे मूल्य दिलेली आहेत.

हजारो वर्षापासून शोषित पीडित लोकांना आर्थिक व राजनैतिक न्याय विचार अभिव्यक्ती स्वातंत्र्य दर्जाची व संधीची समानता दिलेली आहे त्यामुळे हे भारतीय संविधान जगातील उत्कृष्ट संविधान आहे हे संविधान प्रत्येकाने वाचून आपले हक्क व अधिकार मिळण्यासाठी लढले पाहजे संविधानाची पूजा करण्याची गरज नाही वाचण्याची गरज आहे असे मोलाचे मार्गदर्शन करून संवधानाच्या उद्देशीकेचे सामूहिक वाचन करून बलभीम नगर बुद्ध विहारात संविधन दिन उत्साहात साजरा करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले या कार्यक्रमाला अंजली विशाल वडमारे, अंजली तेजस वडमारे, आचल वडमारे, पद्मिणीबाई वडमारे, आशाबाई भालेराव, आरोही अंकुटे, अदिती धनवे,अमित विद्यागर, निशांत वडमारे, आमय वडमारे गोलू विद्यागार, अधिरा वडमारे,पृथ्वी भालेराव, सद्धार्थ विद्यागर, नितीन भालेराव, सिद्धार्थ वडमारे, सेनापती वडमारे, मंगेश वडमारे व परिसरातील सर्व संविधान रक्षक बालक बालिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रविशंकर विद्या मंदिर येथे संविधान दिनाचा कार्यक्रम



बीड प्रतिनिधी

आज दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ वार मंगळवार रोजी श्री रविशंकर विद्यामंदिर पिंपरगव्हाण रोड बीड येथे संविधान दिनाच्या निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष श्री पारगावकर सर, उपाध्यक्ष श्री मुथा सर, संस्थेचे सचिव श्री शेख पाशा सर शाळेचे मुख्याध्यापक श्री हंसे सर, उपमुख्याध्यापिका अनिता सूर्यवंशी मॅडम यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला संविधानाचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर तसेच श्री श्री रविशंकर गुरुजी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना वंदन करण्यात आले.

आपला भारत देश १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला देशाचा कारभार चांगल्या रीतीने चालण्यासाठी मजबूत अशा संविधानाची गरज होती. राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी अतिशय मजबूत असे संविधान निर्माण केले व त्यांनी हे संविधान राज्यघटना समितीला २६ नोव्हेंबर १९४९ रोजी सोपविले म्हणून हा दिवस संविधान दिन म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डिंपल राठोड या इयत्ता आठवीतील विद्यार्थिनीने संविधान दिना विषयी माहिती सादर केली. तर इयत्ता तिसरी ते सातवीतील विद्यार्थ्यांनी संविधानाचा अर्थ उलगडून दाखवणारे असे नाट्य सादर केले. पूर्व प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर तसेच विविध महापुरुषांच्या वेशभूषा धारण करून सर्वांचे लक्ष वेधले. शाळेच्या उपमुख्याध्यापिका अनिता सूर्यवंशी मॅडम नी विद्यार्थ्यांना संविधानाविषयी माहिती सांगितली व सर्व विद्यार्थ्यांना संविधान दिनानिमित्ताने शुभेच्छा दिल्या. तसेच कार्यक्रमात संविधानाचे वाचन करण्यात आले व या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रमांचे ही आयोजन करण्यात आले होते. संविधान निर्मिती विषयीची माहिती सांगणारी चित्रफीत विद्यार्थ्यांना दाखविण्यात आली या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अपूर्वा कुलकर्णी मॅडम यांनी केले.

# महामानव अभिवादन ग्रुप तर्फे संविधान दिन उत्साहात



बीड। प्रतिनिधी

इंग्रजाच्या गुलामगिरीतून आपला देश स्वतंत्र झाल्यानंतर भारताने लोकशाही गणराज्य प्रणाली स्वीकारली व व्यक्ती, स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्यायावर आधारित भारतीय संविधानामुळेच भारतीय लोकशाही आबादीत राहील असे प्रतिपादन प्रमुख वक्ते एड.एस.एम.साळवे यांनी केले.

सर्वप्रथम तथागत व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस पुष्प,पुष्प माला मान्यवरांच्या हस्ते अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.अनेक सामाजिक उपक्रम राबवीत असलेल्या महामानव अभिवादन ग्रुपने आयोजित केलेल्या संविधान दिनानिमित्त ज्येष्ठ नागरिक शांताराम जोगदंड अध्यक्षपदी तर प्रमुख पाहुणे ॲड. हनुमंतराव कांबळे, भारतीय बौद्ध महासभेचे संरक्षण सचिव अमरसिंह ढाका, मंचावर महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम. भोले, डी.जि.वानखेडे, कॅप्टन राजाभाऊ आठवले, एड. तेजस वडमारे यांची प्रमुख उपस्थिती होती. महामानव अभिवादन ग्रुपने एकता नगर, बलभीम नगर व नागोबा गल्ली बीड येथील विद्यार्थ्यांना संविधानाबद्दल जागृत करून १८४ विद्यार्थ्यांना शालेय साहित्यात (वही पेन) मान्यवरांच्या हस्ते वाटप केले. याप्रसंगी विद्यार्थ्यांना व पालकांना संबोधित करताना एड. एस. एम.साळवे यांनी प्रत्येक भारतीय नागरिकांनी घटनेने दिलेले हक्क व कर्तव्य समजून घेणे व त्यानुसार आपले आचरण ठेवणे कसे गरजेचे आहे, असे अनेक उदाहरणाद्वारे समजून सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डी.एम.राऊत तर प्रस्ताविक माजी नगरसेवक राजू जोगदंड यांनी केले.

मुलांना संबोधित करताना प्रशांत वासनिक म्हणाले की विद्यार्थी दशेपासूनच एखाद्या ग्रंथाप्रमाणे संविधानाचे वाचन करून आपले हक्क व कर्तव्याबद्दल जागृत राहून माणसाने माणसाशी माणसासारखे कसे वागावे व संविधानानेच देशाचा राज्यकारभार चालतो तरी उच्च विद्याविभूषित होऊन प्रशासकीय सेवेत जाऊन देश हिताचे कार्य करावे हे अनेक उदाहरणाद्वारे स्पष्ट केले. संविधानाच्या अंमलबजावणी दिवसा पासून पूर्वीच्या, मानवहिताच्या विरुद्ध जे अनिष्ट नियम होते ते एका दिवसात घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेद्वारे नष्ट केले हे समजावून सांगितले. हनुमंतराव कांबळे यांनी संविधानाचे प्रास्ताविक म्हणजे घटनेचे सार आहे तरी प्रार्थनेसारखे दररोज सकाळी आपली दिनचर्या सुरू करण्या पूर्वी वाचन करून तसे आचरण करावे असे स्पष्ट केले.कार्यक्रमास आयु. नैतिक भोले, भीमराज काकडे, आर्यन भोले, संघर्ष इनकर, रजनीकांत वाघमारे, कोमल वाघमारे, भगीरथी वाघमारे, कमल वाघमारे, वंदना वाघमारे, जमुनाबाई वडमारे, सुमन जोगदंड, शांता अक्का, रमाबाई जोगदंड, इंदिराबाई जोगदंड, बजरंग जोगदंड, सविता जोगदंड व परिसरातील बहुसंख्य विद्यार्थी व पालकांची उपस्थिती होती. संविधान प्रस्ताविकेच्या सामूहिक वाचनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# स्वस्त धान्य दुकानांमधील गहु, तांदुळ तहसीलदारांना भेट



बीड। प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये नागरिकांना स्वस्त धान्य दुकानांमध्ये होणारे गहू तांदूळ हे निकृष्ट दर्जाचे असून ते खाणे योग्य नाहीत आम आदमी पार्टीने पाठीमागे देखील या विषयावर आंदोलन केले होते परंतु त्यामध्ये कसलाही सुधार झालेला नाही आज अंजनवती तालुका जिल्हा बीड येथील स्वस्त धान्य दुकानावरती नागरिक धान्य घेत असताना निदर्शनास आले की हे धान्य बिलकुल खाणे योग्य नसून त्यामध्ये कचरा माती गुटक्याचे रेफर सर्व मिक्स करून गहू आणि तांदळामध्ये देण्यात येत आहे याला जबाबदार कोण त्या मरते दोशी असणाऱ्या अधिकाऱ्यांवरती कारवाई करा हे विचारण्यासाठी हे गहू आणि तांदूळ बीड येथील पुरवठा अधिकारी व तहसीलदार यांना आम आदमी पार्टीच्या वतीने भेट देण्यात येणार आहे व हे तांदूळ व गहू या अधिकाऱ्याने खाऊन दाखवावेत असेही त्यांना विनंती केली यावेळी माजी सैनिक अशोक येडे जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी शहराध्यक्ष सय्यदेक माऊली शिंदे पंडित वाघमारे रामभाऊ शेरकर आजम खान इत्यादी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राज्य
लोकतंत्र
गुरूवार, दि.२८ नोव्हेंबर २०२४ | ६

# केज शहरातील शासकीय नाम-फलकांनी घेतला मोकळा श्वास

## गावाचे अंतर दर्शवणारे नामफलक बनले होते जाहिरातीचे फलक

**दिनकर जाधव । सारणी**

केज शहरात असणाऱ्या सर्वच शासकीय बोर्डावर कोणत्या ना कोणत्या नेत्यांच्या वाढदिवसाचे बनर लावले जात होते. परंतु जशी महाराष्ट्र विधानसभा निवडणूक जाहिर झाली आणि आचारसंहिता भंग या कारवाहीच्या भितीने शहरातील नामफलके रिकामे झाले त्यामुळे या फालकांना आपण मोकळा श्वास घेतल्याचे जाणवत असेल.



केज शहरातील आवश्यक असलेली शासकीय नाम फलक हे नेहमीच बहुतांश वेळी वाढदिवसाच्या बॅनरचे ठिकाण बनलेले पाहावयास मिळत आहे. शासकीय बोर्ड असला की तेथे वैयक्तिक जाहिराती या चिटकवलेल्या, लावलेल्या असतातच. परंतु विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेच्या अनुषंगाने बहुतांश शासकीय बोर्ड आता मोकळा श्वास घेत असलेले पाहावयास मिळत आहेत. यामुळे शहरातून बाहेर जाणार्या प्रवाश्यांना या नाम फलकाचा उपयोग होतो, कारण कोणते शहर किंवा कोणते ठिकाण किती अंतर आहे हे त्यांना आता सहज समोर पाहिल्याबरोबरच दिसत आहे. परंतु काही दिवस मोकळे वाटणारे बोर्ड आता जाहिरातीचे बोर्ड बनतील यात मात्र शंका नाही. त्यामुळे किमान महत्त्वाच्या शासकीय बोर्डवर तरी जाहिरात तिचे फलक लावलेले नसावेत अशी चर्चा सामान्य नागरिकांमध्ये होताना दिसत आहे.

# सोयाबीन पाठोपाठ कापूस उत्पादक शेतकरी संकटात-दत्ता वाकसे

## शासनाचा हमीभाव गेला खड्ड्यात शेतकऱ्याची होते लूट

**बीड । प्रतिनिधी**

सध्या राज्यात विधानसभेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने राजकीय वातावरण खूपच तापले असून ज्याला त्याला आपलीच पडली आहे. यात शेतकरी मात्र पूर्णपणे दुर्लक्षित असल्याचे चित्र दिसत आहे. सोयाबीन उत्पादक शेतकरी अल्प दरामुळे अडचणीत असताना आता कापसाचीही केवळ ७ हजार रुपये प्रति क्विंटल दराने व्यापारी खरेदी करीत असताना कापूस उत्पादक शेतकरी हवालदिल असून शेतकऱ्याचा वाली कोण असा संकुचित प्रश्न शेतकऱ्यासमोर असल्याची तिखट प्रतिक्रिया शेतकरीपुत्र



शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे महाराष्ट्र राज्याचे व्हाईस प्रेसिडेंट दत्ता वाकसे यांनी व्यक्त केली आहे.राज्यात यंदाच्या हंगामातील कापसाची खरेदी सुरू झाली आहे. शेतकरी कपाशीच्या वेचणीसाठी मजुरांची शोधाशोध करीत आहेत शेतकऱ्यांना आधीच मजूर मिळणे कठीण झाले आहे. त्यात निवडणुकीच्या धामधुमीत मजुरांची टंचाई भासत होती तेव्हा मजुरांना कापूस वेचणीसाठी अधिक दराने मजुरी देऊन वेचून आणलेला कापूस मात्र शेतकऱ्यांना कमी दरात विकून मजुराची तजवीज करावी लागत आहे. मागील वर्षी ७ हजार ५००रुपयाच्यावर न गेलेला कापसाचा दर दोन वर्ष आधी ९ हजार रुपये प्रतिक्विंडलाचे दर मिळालेला कापूस आज कवडीमोल भावात विकावे लागत असल्याने शेतकऱ्याने आता कोणत्या विकास आघाडीवर विश्वास दर्शवावा हाच कळीचा मुद्दा असल्याचे मतही दत्ता वाकसे यांनी व्यक्त केले आहे. सन २०१३

◀◀ पान ३ वर

# पुणे-मुंबईसाठी ज्यादा ई बसेस सोडण्याची मराठी पत्रकार परिषदेची मागणी

## पुण्याला प्रत्येक तासाला गाडी सोडली जाईल -दुसाने

**बीड । प्रतिनिधी**

पुणे आणि मुंबईसाठी जादा बसेस नसल्याने प्रवाशांची हेळसांड होत असून याचा फायदा खाजगी बसवाले घेतात. त्यांच्याकडून अव्वाच्या सव्वा दर आकारला जातो. सीझनमध्ये तर दुप्पट, तिप्पट पैसे घेतले जातात. त्यासाठी विभागीय नियंत्रकांनी युण्यासाठी रात्री तीन गाड्या आणि मुंबईसाठी रात्री तीन गाड्या अशा सहा गाड्या सोडाव्यात अशी मागणी मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने विभागीय नियंत्रक श्रीमती अ.सं.दुसाने यांच्याकडे केल्यानंतर त्यांनी नवीन गाड्या आल्यानंतर प्रत्येक एका तासाला गाडी सोडण्यात येईल .मात्र त्यासाठी आणखी बसेसची



आवश्यकता आहे. नवीन गाड्या आल्यानंतर व्यवस्था होईल याशिवाय मुंबईसाठी आणखी तीन गाड्या सोडू असे आश्वासन त्यांनी दिले.

# मराठवाडा साहित्य परिषदेच्या सहकार्यवाहपदी प्राचार्य डॉ.दिपाताई क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

मराठवाडा साहित्य परिषदेच्या नुकत्याच झालेल्या कार्यकारिणी समितीच्या निवडणुका पार पडल्या. यात मराठवाड्यातील २२ सदस्य कार्यकारिणीत निवडूण आले. पदाधिकार्यांची निवड नुकतीच छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात आली आहे. यात मसाप अध्यक्ष कौतुकराव ठाले पाटील, उपाध्यक्ष, आसाराम लोमटे, रामचंद्र तिरूके कोषाध्यक्ष, रामचंद्र काळुंखे तर



सहकार्यवाह प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर व डॉ.गणेश मोहिते यांची निवड झाली.

नुकत्याच मराठवाडा साहित्य परिषदेच्या पंचवार्षीक निवडणुका झाल्या. यात मराठवाडयातील आठ जिल्हयातून २२ सदस्य निवडून आले आहेत. कार्यकारिणी सदस्य म्हणून निवडूण आलेल्या प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर यांना मुख्य पदाधिकारी यांच्या समितीत सहकार्यवाह ही जबाबदारी देण्यात आली आहे. पाच वर्षासाठी ही निवड आहे. त्यांच्याकडे नाट्य परिषद मुंबईचे कार्यकारिणी सदस्य, बालरंगभूमी मुंबईच्या उपाध्यक्ष, बीड

◀◀ पान ३ वर



**मुंबई :- येथे पंकजाताई मुंडे यांच्या वतीने माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे पाचव्यांदा आमदार झाल्याबद्दल आ.प्रकाश सोळंके यांचा सत्कार करतांना भाजपाच्या राष्ट्रीय नेत्या आ.पंकजाताई मुंडे व त्यांच्या आई श्रीमती प्रज्ञा गोपिनाथराव मुंडे**

### धनगर समाजाला एसटी आरक्षणाची अंमलबजावणी करावी -हजारे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या आरक्षणाचा लाभ मिळावा, या प्रमुख मागणीला घेऊन मागील चार महिन्यांपूर्वी लातूरसह महाराष्ट्रात अनेक ठिकाणी उपोषण, विविध आंदोलने झाली. समाज बांधवांनी संविधानामध्ये अनुसूचित जमातीच्या सूचित धनगर जमात समाविष्ट असल्याचे सांगून अंमलबजावणी केली जात नसल्याचा



◀◀ पान ३ वर

# माळी समाजाच्या नेहमी सुखदु:खात साथ देणाऱ्या आमदार सुरेश धस यांना मंत्री करा

## रामेश्वर गोरे,हानुमान शेलार,गणेश शेवाळे यांची मागणी

**पाटोदा । प्रतिनिधी**

जातीपातीच्या राजकारणाला कधीही थरा न देणारे सर्व जाती धर्मातील सामान्य माणसाच्या नेहमी सुखदु:खात धाऊन जाणारे महायुतीचे आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे अधिकृत उमेदवार सुरेश रामचंद्र धस यांनी आष्टी विधान सभेच्या निवडणुकीत भूतो ना भविष्य अशा प्रचंड मतांनी निवडून येऊन महाराष्ट्र राज्यातील जनतेची मन जिंकली आहे त्यामुळे पक्षश्रेष्ठींनी जाती पातीच्या राजकारणाला थरा न देता आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघात ऐतिहासिक विजय मिळवनार्या आमदार सुरेश आण्णा धस यांना पक्षश्रेष्ठींनी



महाराष्ट्र राज्याच्या कॅबिनेट मंत्रीपदी संधी द्यावी अशी मागणी पाटोदा नगरपंचायतचे सभापती रामेश्वर गोरे, निरगुडी गावचे माजी सरपंच हनुमान भैय्या शेलार,माळी महासंघाचे तालुका अध्यक्ष गणेश शेवाळे यांनी केली आहे.केंद्रात आणि राज्यात महायुतीचे सरकार स्थापन करण्यासाठी आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातील जनतेने मोठा कौल दिला आहे. त्यामुळे आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघासह महाराष्ट्र राज्याच्या जनतेच्या मनातील प्रश्नांची जान असणाऱ्या भारतीय जनता पार्टीच्या आष्टी विधानसभेचे लोकनियुक्त आमदार लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस यांनी

◀◀ पान ३ वर

## ग्रेट भेट...







**मुंबई येथे आ.धनंजय मुंडे यांची जयसिंह सोळंके, सचिन सानप, भागवत दराडे आदींनी भेट घेवून शुभेच्छा दिल्या. तर दुसऱ्या छायाचित्रात सचिन सानप यांनी आ.प्रकाश सोळंके यांना शुभेच्छा दिल्या. तसेच धनंजय मुंडे यांच्यासोबत जयसिंह सोळंके यांचा एक क्षण.**



# बाल विवाह थांबण्यासाठी शपथ घेण्यात आली

**जालना । प्रतिनिधी**

आयुक्त महिला व बालकल्याण विभाग पुणे व जिल्हाधिकारी जालना यांच्या आदेशावरून बाल विवाह होऊ नये या साठी जनजागृती व्हावी म्हणून दि. २७/११/२०२४ महापालिका जालना अंतर्गत जालना शहर महानगर पालिकेतील बचत गट, महानगरपालिका शाळा व महानगरपालिका आरोग्य विभाग ई. ठिकाणी कार्यक्रम आयोजित करून

◀◀ पान ३ वर

## शिवाजी भवर यांचे निधन

अंबड । प्रतिनिधी

अंबड शहरातील नाथेक्रर चौकातील रहिवाशी शिवाजी अप्पाराव भवर यांचे दि. २७ नोव्हेंबर रोजी पहाटे ५ वाजेच्या सुमारास हृदयविकाराच्या तिव्र झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी ते ५९ वर्षाचे होते. त्यांचा स्वभाव मनमिळावू होता. त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, १ मुलगी , २ भाऊ ,१ बहिन, नातु-नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर अंबड येथील हिंदु स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.



# डॉ. विठ्ठल जाधव यांचे बीड आकाशवाणीवर कथाकथन

शिरूर कासार । प्रतिनिधी

येथील प्रसिद्ध साहित्यिक डॉ. विठ्ठल जाधव यांची 'इकडले ना तिकडले' ही कथा बीड आकाशवाणी केंद्रावर 'अक्षरलेणी' या साप्ताहिक साहित्यिक कार्यक्रमात दि.३० नोव्हें. शनिवार रोजी सायं.६.०० वाजता प्रसारित होणार आहे.



सामान्य माणसाचं जगणं आणि वर्तमान लोकशाही मूल्ये यातील तफावत 'ईकडले ना तिकडले' या कथेतून डॉ. विठ्ठल जाधव मांडतात. मतदार आणि मतदान याविषयी क्लृप्त्या, फंडे कसे निर्माण केले जातात? सामान्य मतदार संभ्रमीत केला जातो. याचे हुबेहूब वास्तव चित्रण, वर्णन, पात्र, प्रसंग यांच्या माध्यमातून 'इकडले ना तिकडले' या कथेतून रंजकतेने मांडले आहेत. निवडणूक आणि निवडणूक संपल्यानंतर विजयी आणि पराजित उमेदवार यांचे वर्तन बदलत जाते. देवाणघेवाण, आश्वासनाचे काय होते. यासह लोकशाही राज्यव्यवस्थेत मतदान प्रक्रियेच्या वळणावर ही कथा महत्वपूर्ण ठरते. कथा ऐकावी असे आवाहन करण्यात येते.

# अंबाजोगाईत मधुमेहावरील महाशिबीर व मोफत रक्त तपासणी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाईत मधुमेहावरील महाशिबीर व मोफत रक्त तपासणी शिबिराचे आयोजन २९ नोव्हेंबर शुक्रवार रोजी सकाळी ९.३० वाजता योगेश्वरी डायबेटीस केअर सेंटर, प्रशांत नगर, अंबाजोगाई येथे आयोजित करण्यात आले आहे. अशी माहिती प्रसिद्ध मधुमेह तज्ज्ञ डॉ अतुल शिंदे यांनी दिली.



येथील रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी,आयएमए , ऑम्मपा व योगेश्वरी डायबेटीस केअर सेंटर, प्रशांत नगर, अंबाजोगाई यांच्या वतीने दर वर्षी जागतिक मधुमेह दिनाचे औचित्य साधून अंबानगरीतील नागरिकांसाठी जागतिक मधुमेह दिनानिमित्त मधुमेहावरील महाशिबीर व मोफत तपासण्या व मोफत औषध उपचार केले जातात. याही वर्षी ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.या शिबिराचा लाभ सर्व मधुमेही, रक्तदाब, थायरॉईड, हृदयविकार व ४० वर्षापासून पुढील व्यक्तींनी घ्यावा.असे आवाहन प्रसिद्ध मधुमेह तज्ज्ञ डॉ अतुल शिंदे यांनी केले आहे.

◀◀ पान ३ वर

# पक्षश्रेष्ठींनी पकंजाताई मुंडे यांची कॅबिनेट मंत्रीपदी निवड करावी -ॲड. घुमरे

**पाटोदा । प्रतिनिधी**

लोकनेते गोपीनाथ मुंडे साहेब यांच्या कन्या भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पकंजाताई मुंडे या विधानसभा निवडणुक २०२४ भाजप महायुतीच्या स्टार प्रचारक म्हणून मैदानात उतरल्या होत्या जवळपास त्यांनी ३२ सभा महाराष्ट्रात घेतल्या होत्या यामध्ये अनेक ठिकाणी त्यामध्ये पुणे जिल्हा असेल, बीड जिल्हा असेल, परभणी, नांदेड, जालना,



नाशिक, बुलढाणा अहिल्यानगर , लातुर, धाराशिव परभणी या ठिकाणी घवघवीत यश महायुतीच्या उमेदवार यांना पकंजाताई मुंडे यांच्या सभेमुळे मिळाले आहे मराठवाड्यात लोकसभा निवडणुकीत जरांगे फॅक्टर मुळे बॅक फुटवर गेलेल्या भाजपला विधानसभा निवडणुकीत दणदणीत यश मिळवण्यात तसेच ओबीसी व्होट बँक लोकनेते गोपीनाथ मुंडे साहेब यांचा माधव पॅटर्न एकत्रित करून ती ताकद महायुतीच्या पाठीशी ऊभी करण्यात पंकजाताई मुंडे यांच्या रूपाने यशस्वी होण्यास मदत झाली आहे



हे वास्तव नाकारता येणार नाही मराठवाड्यात ४६ पैकी १९ जागेवर भाजपचा दणदणीत विजय तर महायुतीचा ३६ जागेवर विजय झालेला आहे बीड जिल्ह्यात तर भाजप महायुतीचा २०१९ मधे केज व गेवराई वगळता भाजपला यश आले नव्हते आज त्या उलट परिस्थिती आज बीड जिल्ह्यात दिसत आहे आ.पकंजाताई यांनी सामाजिक समतोल साधत पुर्ण ताकदीने महायुतीचे उमेदवार बीड जिल्ह्यात विजयी करण्यासाठी जंग जंग पछाडले ६ पैकी भाजप महायुतीच्या ५ उमेदवारांना विजय खेचून आणला केवळ १ उमेदवार महाविकास आघाडीचा निसटता विजय मिळवला. खऱ्या अर्थाने मराठवाड्यात महायुतीच्या विजयी उमेदवार यांना विजयी करण्यात किंगमेकर म्हणून पंकजाताई मुंडे यांनी भूमिका बजावली आहे त्यामुळे होऊ घातलेल्या

◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# ईस्त्रायली कंपनीच्या माध्यमातून मतदान यंत्रात; प्रशांत जगतापांचा मोठा आरोप

पुणे: विधानसभा निवडणूकीसाठी वापरण्यात आलेल्या मतदान यंत्रात ईस्त्राईल येथील कंपनीच्या तंत्रज्ञानाचा वापर करुन फेरफार करण्यात आला. यामध्ये महायुतीच्या उमेदवरांच्या मतदानात १५ ते २५ टक्के वाढ करण्यात आली असा आरोप हडपसर विधानसभा मतदासंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार प्रशांत जगताप यांनी केला. ईस्त्राईलमधील काही जण ओळखीचे असून त्यांनी यासंदर्भात माहिती दिली असल्याचा दावा त्यांनी यावेळी केला.



ईव्हीएम बाबत असणार्या तक्रारी संदर्भात पुणे जिल्ह्यातील महाविकास आघाडीचे सर्व उमेदवारांची राष्ट्रवादी भवन येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विधीज्ञ असीम सरोदे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष अंकुश काकडे, शिवसेना ठाकरे गटाचे शहराध्यक्ष संजय मोरे, काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस ॲड. अभय छाजेड, महाविकास आघाडीचे सचिन दोडके, रमेश बागवे, दत्ता बहिरट, अशोक पवार आदी उपस्थित होते.

या बैठकीतनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत बोलतांना प्रशांत जगताप म्हणाले, मतदान यंत्रे हॅक करुन १५ ते २५ टक्के मतदान सेट करण्यात आले होते. मागच्या २५ वर्षांच्या काळात निवडणूकीत पराभव झाल्यानंतर आम्ही जनतेचा कौल मान्य केला आहे. यंदाच्या निवडणूकीत हा जनतेचा कौल नसून महायुतीच्या उमेदवरांसाठी पडद्यामागुन शक्तीनी यंत्रणा वापरून मतदान यंत्रात बदल घडविला आणि त्यातुन झालेला हा पराभव आहे.

मतदान यंत्राच्या आधी मतपत्रिकेवर मतदान घेण्यात येत होते. त्यावेळी मतपेटी उघडून त्यात काही नसल्याचे दाखवून ते सिल करण्यात येत होते. तीच पद्धत मतदान यंत्रासंदर्भात वापरली जाते. सुरूवातीला मॉक पोल करुन झीरो मतदान दाखविले जाते. त्या मशीनला मतदानाच्या दिवशीचा चिन्ह अपलोड करतांना सकाळी ९ ते सायंकाळी ४ पर्यंतचा प्रोग्रम दिला जातो. यामुळे मतदानाच्या दिवशी प्रोग्रॅम काम करतो. हा प्रोग्रॅम निवडणूकीच्या आधी आणि नंतर काम करत नाही, असे जगताप यांनी सांगितले.

### आयोगाकडे पैसे भरणार

व्हीव्हीपॅटची मोजणी करण्यासाठी निवडणूक आयोगाकडे पैसे भरणार आहे. हडपसर मतदासंघात ५३२ मतदान केंद्र होते. त्यातील ५ टक्यांप्रमाणे २७ मतदान केंद्रावरील व्हीव्हीपॅटमधील चिठ्यांचे मोजणी करण्यात येईल. याच बरोबर न्यायालयात याचीका दाखल करण्यात येणार आहे. न्यायालया समोर ईव्हीएम संदर्भातील सगळे पुरावे सादर करणार.

### सुप्रीम कोर्टाचा महाविकास आघाडीला धक्का

ईव्हीएम मशीनमध्ये घोळ करण्यात आल्याने आपल्या सर्वाधिक उमेदवारांचा पराभव झाला असे म्हणत याविरोधात सुप्रीम कोर्टात एक याचिका दाखल केली होती. मात्र सुप्रीम कोर्टाने ही याचिका फेटाळून लावली आहे. त्यामुळे महाविकास आघाडीला मोठा धक्का बसला आहे. महाविकास आघाडीने बॅलेट पेपरवर निवडणूक घेण्याची मागणी केली होती. त्यावर आज कोर्टात सुनावणी पार पाडली. सुप्रीम कोर्टाने महाविकास आघाडीची बॅलेट पेपरवर निवडणूक घेण्याची याचिका फेटाळली आहे. पराभव झाला तर ईव्हीएम मशीनमध्ये बिघाड आणि तुम्ही जिंकलात तर ते यश. असे कसे होऊ शकते? असा सवाल सुप्रीम कोर्टाने उपस्थित केला.

# विजयानगर कॉलनीतील 'ती' जागा ट्रस्टकडे; महापालिकेची 'ओपन'स्पेस' परत मिळविण्यासाठी धावाधाव




पुणे: सदाशिव पेठेतील विजयानगर कॉलनी मधील 'ओपनस्पेस' ची जागा न्यायालयाच्या आदेशानुसार लक्ष्मीबाई चास्टवे चॅरिटेबल ट्रस्टने ताब्यात घेतली आहे. दरम्यान, महापालिकेने या जागेचा ताबा दिला नाही असा दावा केला आहे. ही जागा परत मिळविण्यासाठी आता महापालिकेच्या विधी विभागाला धावपळ करावी लागणार आहे.

शहराच्या मध्यभागी असलेल्या विजयानगर कॉलनी येथील सुमारे ६ हजार ५४. ३१ चौरसमीटर एवढी जागा ओपन स्पेस म्हणून दर्शविली गेली आहे.

१९८८ साली महापालिकेने या जागेचा गैरवापर होत आहे, या ठिकाणी कचरा टाकला जात असल्याने विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीप्रमाणे जागा मालकास नोटीस पाठविली होती. तसेच केवळ एक रुपयाच्या नाममात्र मोबदल्यात ही जागा महापालिकेने ताब्यात घेतली. त्याविरुद्ध ट्रस्टने कनिष्ठ स्तर दिवाणी न्यायालयात दाद मागितली होती. या दाव्याचा १९९९ साली निकाल लागला. सदर निकालानुसार जागेचा ताबा घेण्यापासून महापालिकेला मनाई केली होती. सदर जागा ताबा घेताना आवश्यक प्रक्रीया पार पाडली गेली नसल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदविले होते.या नंतर महापालिकेने २००० साली पुन्हा जागा ताब्यात घेण्याची प्रक्रीया सुरु केली. दरम्यान, ट्रस्टने २०२० साली न्यायालयात दरखास्त दाखल करून २००७ च्या न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याची मागणी केली होती. यासंदर्भात महापालिकेला नोटीस मिळाली नाही असा दावा विधी विभागाकडून केला जात आहे. या दरखास्तीनुसार १९ नोव्हेंबर रोजी सदर जागेचा ताबा हा न्यायालयाच्या आदेशानुसार ट्रस्टला दिला गेला.

# सावत्र आईला 'अम्मी' म्हणण्यास नकार दिला, निर्दयी बापाने मुलाला ठार मारले

मुंबई । प्रतिनिधी

बापाने दुसरं लग्न केलं, मुलाची सावत्र आई घरी आणली. यानंतर मुलावर बापाने सावत्र आईला 'अम्मी' म्हणण्याची सक्ती केली. जन्मदात्या आईवर प्रेम करणाऱ्या मुलाने बापाची ही मागणी धुडकावून लावली. याचा राग आल्याने बापाने कात्रीने भोसकून मुलाला ठार मारली. ही भयानक घटना मुंबईतील डोंगरी भागात घडली आहे. सलीम अली शेख उर्फ मद्रासी असं आरोपीचं नाव असून मयताचे नाव इम्रान शेख असं आहे. याहूनही धक्कादायक बाब ही आहे की जेव्हा हा प्रकार घडला तेव्हा रात्रीचे साडेनऊ वाजले होते आणि गजबजलेल्या परिसरात हा खून करण्यात आला आणि या गुन्ह्याबद्दल पोलिसांना कळवण्याची कोणीही तसदी घेतली नाही.

२०१८ साली घडलेल्या या घटनेचा निकाल लागला असून आरोपी 'सलीम उर्फ मद्रासी' याला दोषी ठरवण्यात आले होते. सलीमला मुंबई सत्र न्यायालयाने मुलाचा खून केल्याबद्दल जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. सलीम हा ४९ वर्षांचा आहे तर त्याचा मुलगा इम्रान हा २० वर्षांचा होता. न्यायाधीश एस.डी.तवशीकर यांनी आपल्या आदेशात म्हटले की इम्रानचा मृत्यू



झाल्यानंतर सदर प्रकार पोलिसांना कळवण्यासाठी कोणीही पुढे आले नाही. ही बाब जेव्हा इम्रानच्या आईला कळाली तेव्हा तिने पोलिसांत धाव घेतली होती. सदर घटनेमुळे घटत चाललेली संवेदनशीलता आणि अशा गंभीर प्रकारांबद्दल लोकांची बेफिकीर वृत्ती ही ठळकपणे दिसून आली आहे. इम्रानच्या मृत्यूचा खटला न्यायालयात उभा राहिला तेव्हा इम्रानची आई परवीन शेख हिने सांगितले की इम्रान हा अंमली पदार्थांच्या अमलाखाली होता तेव्हा त्याचे आणि सलीमचे भांडण झाले , भांडणादरम्यान सलीमने इम्रानला ठार मारले आणि नंतर स्वत:लाही जखमी करून घेतले. न्यायाधीशांनी म्हटले की मुलाच्या मृत्यूनंतर परवीन ही आपल्या नवऱ्यावर बालंट येऊ नये यासाठी प्रयत्न करत होती. मात्र परिस्थितीजन्य पुरावे हे वेगळी कहाणी सांगत होते.

आरोपीच्या वकिलांनी युक्तिवाद केला की त्याला या प्रकरणात नाहक गोवण्याचा प्रयत्न केला. यावर निकालात म्हटले आहे की, आरोपी हा मयताचा बाप होता, तरीही त्याने त्याच्याबद्दल कोणतीही सहानुभूती दाखवली नाही. इम्रानला भोसकल्यानंतर त्याला परवीनने रुग्णालयात दाखल केले. रुग्णालयात इम्रानला मृत घोषित केले होते. यावरून सलीम हा घटनास्थळीही नव्हता आणि रुग्णालयातही नव्हता हे दिसून येते असे निकालात म्हटले आहे.

# आमदार रोहित पाटील यांच्या विजयाचे बॅनर न्यूयॉर्कमध्ये, काय आहे त्या बॅनरमध्ये

पुणे । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीचा निकाल २३ नोव्हेंबर रोजी आला. त्यानंतर राज्यातील सर्व विजय उमेदवारांचे अभिनंदन केले जात आहे. त्यासाठी ठिकठिकाणी जाहिराती केल्या जात आहे. गावांमध्ये आणि शहरांमध्ये बॅनरबाजी केली जात आहे. परंतु मतदार संघाबाहेर एखाद्या आमदाराची बॅनरबाजी क्वचितच होत आहे. राज्य पातळीवरील नेत्यांचे बॅनर राज्यभरात लागले आहे. परंतु राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे आमदार रोहित पाटील यांचे बॅनर भारताबाहेर अमेरिकेत लागले आहे. या बॅनरमधून रोहित पाटील यांना विजयाबद्दल शुभेच्छा देण्यात आल्या आहेत. अमेरिकेतील भारतीयांमध्ये हे बॅनर चर्चेचा विषय ठरला आहे.

रोहित पाटील यांना अमेरिकेतून शुभेच्छा

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि राज्याचे माजी उपमुख्यमंत्री आर.आर.पाटील यांचे चिरंजीव रोहित पाटील आहे. वयाच्या २५ व्या वर्षी आमदार होण्याची किमया त्यांनी केली. ते राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाकडून तासगाव कवठेमहांकाळ मतदार संघातून निवडून आले. त्याबद्दल आमदार रोहित पाटील




यांना शुभेच्छा देणारा फलक थेट साता समुद्रापार अमेरिकेत झळकला आहे.

टाइम्स स्केअरमध्ये झळकले बॅनर

अमेरिकेच्या न्यूयॉर्कमधल्या प्रसिद्ध टाइम्स स्केअरवर चौकातल्या प्रसिद्ध बिल्डिंगवरील डिजिटल बिलबोर्डवर रोहित पाटील यांना शुभेच्छा देणारा फलक झळकला आहे. रोहित पाटील यांच्या न्यूयॉर्कमधील चाहत्यांनी त्यांना विजयाबद्दल शुभेच्छा दिल्या आहेत. रोहित पाटील यांना अमेरिकेत शुभेच्छा फलक सध्या सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला आहे. रोहित पाटलांच्या अभिनंदनच पोस्टर थेट अमेरिकेत त्यांच्या मित्रांनी झळकवल्यामुळे तो चर्चेचा विषय ठरला आहे.

महिन्याभरापूर्वी जाहिरातीचे बुकींग

आमदार रोहित पाटील यांचे काका राजाराम पाटील यांनी सांगितले की, रोहितच्या विजयाने अमेरिकेतील त्याच्या मित्रमंडळींना आनंद झाला आहे. विशेष म्हणजे टाइम्स स्केअरवर जाहिरात करण्यासाठी एक महिन्यांपूर्वी बुकींग करावे लागते. त्या मित्रमंडळींनी निकालापूर्वी हे बुकींग केले होते. संजयकाका पाटील यांचा पराभव केला. रोहित पाटील यांनी २७ हजारांच्या लीडने दणदणीत विजय मिळवला आहे. संजयकाका पाटील यांच्यासाठी या मतदार संघात अजित पवार यांनीही सभा घेतल्या होत्या.

# 'बटेंगे-कटेंगे'ची भाषा संविधानाशी प्रतारणाच; काँग्रेस नेते गोपाळ तिवारी यांचं विधान

पुणे । प्रतिनिधी

घटनात्मक पदांवरील सत्ताधाऱ्यांनी सत्तारूढ होताना घेतलेली शपथ ही औपचारिकता नसून, संविधानिक प्रजासत्ताक भारताच्या जनतेप्रती घटनात्मक बांधिलकी असल्याचे सत्ताधारी नेते सोयीस्करपणे विसरत आहेत, अशी टीका काँग्रेस नेते व राज्य प्रवक्ते गोपाळ तिवारी यांनी केली.

गोपाळ तिवारी म्हणाले, 'खरेतर निवडणूक काळात, सत्ताकाळात जनतेप्रती केलेल्या कामाचा लेखा-जोखा देण्याऐवजी 'धर्म-जाती'च्या नावे ध्रुवीकरणाचा प्रयत्न करणे हे संविधानविरोधी कृत्य असून, निवडणूक आयोग मात्र बघ्याची भूमिका घेत असल्याने, लोकशाहीसाठी ही बाब दुर्दैवी असल्याचे गोपाळ तिवारी यांनी सांगितले. 'भारतीय संविधान दिना'च्या औचित्याने राजीव गांधी स्मारक समितीच्या वतीने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

२६/११ च्या हल्ल्यात शहीद झालेल्या पोलीस अधिकारी व जवानांना सुमनांजली वाहण्यात आली. ते पुढे म्हणाले की, 'नुकत्याच झालेल्या राज्यातील निवडणुकीत 'लोकशाही राज्य व्यवस्थेच्या' कार्याच्या लेखा-जोख्यावर चर्चा अपेक्षित असते. मात्र, घटनात्मक पदांवरील नेते यांनी 'जाती-धर्माचे ध्रुवीकरण' करून सत्ता हस्तगत करण्याचा प्रयत्न अविवेकी आहे. १४० कोटींच्या देशात अल्पसंख्याक भारतीय मुस्लिम मात्र १८ कोटींच्या घरात असताना, सत्ताधारी भाजपकडून आगपाखड होणे हास्यास्पद असून, सामाजिक सुरक्षा राखण्यात भाजप सरकार अपयशी ठरत असल्याची पावती आहे'.

स्वातंत्र्य संग्रामात सर्वधर्मियांचे योगदान

स्वातंत्र्य संग्रामात सर्वधर्मियांचे योगदान असताना, संविधानातील 'धर्मनिरपेक्ष व समाजवाद' शब्द काढण्याबाबतचा महत्वपूर्ण निकाल 'सर्वोच्च न्यायालयाने' काल संविधान दिनाच्या पूर्वसंध्येला देऊन भारतीय संविधानाची व्याख्या ही स्वातंत्र्य, समता, बंधुता व समानता भिमुख' असल्याचे सुस्पष्ट केल्याचे समाधान असल्याचे गोपाळ तिवारी यांनी यावेळी सांगितले.

संविधानाची तत्वे अंगिकारण्याची गरज

भारतीय नागरिकाने संविधानाची तत्वे अंगिकारण्याची गरज आहे. तरच आम्ही भारतीय नागरिक असे आपण म्हणू शकतो, असे विधान, पश्चिम महाराष्ट्र शिक्षक संघटनेचे अध्यक्ष प्रा. सचिन दुर्गाडे यांनी यावेळी केले. संविधानातील मतदानाचा हक्क ईव्हीएमच्या वावटळीत हरवला काय? असे वाटायला लागले असल्याचे ड. संतोष जाधव यांनी सांगितले. भारतीय संविधानाचे वाचन, प्रसारण व जागरुकता ही प्रत्येक भारतीयाने अंगीकृत करणे ही काळाची गरज असल्याचे ॲड. संदिप ताम्हणकर यांनी सांगितले.

# सीएम भाजपचाच होणार, ते फक्त फडणवीस की...' रोहित पवारांनी बड्या नेत्याचा उल्लेख करत सस्पेन्स वाढवला

पुणे: राज्यात विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीने मोठं यश मिळवलं. मात्र, आता राज्याच्या मुख्यमंत्री पदासाठी मोठी रस्सीखेच दिसून येत आहे. एकीकडे देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्रीपदाचे प्रबळ दावेदार मानले जात असतानाच आता दुसरीकडे एकनाथ शिंदे यांच्या नाराजीच्या चर्चा आहेत. मुख्यमंत्रीपदावरून सध्या चर्चांना उधाण आलं आहे, अशातच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवारांच्या पक्षाचे आमदार रोहित पवारांनी मुख्यमंत्री भाजपचाच होणार पण तो कोण असणार असं म्हणत सस्पेन्स वाढवला आहे.

पहिल्याच दिवशी या गोष्टी व्हायला पाहिजे...

मुख्यमंत्रीपदाबाबत घोळ आहे. एकनाथ शिंदे यांना राज असल्याच्या चर्चा आहेत. आकडे जर बघितले तर भाजपाचा आकडा अशा पद्धतीने आलेला आहे, जर एकनाथ शिंदे यांनी खूप वेळ घालवला तर अजित पवार आणि भाजप मिळून सत्ता स्थापन करू शकतात. जर अजित पवार यांनी वेळ घालवला तर भाजप आणि एकनाथ शिंदे सरकार स्थापन करू शकतात. त्यामुळे आता बरंच काही दिवस या गोष्टी चालतील, असं नाही. पहिल्याच दिवशी या गोष्टी व्हायला पाहिजे होत्या. उगाच रटाळ पद्धतीने खेचाखेची सुरू आहे. सगळ्यांना माहिती आहे. काय होणार आहे. भाजपला मुख्यमंत्रीपद तिथं येऊ शकते. फक्त दाखवण्यासाठी कदाचित एकनाथ शिंदे साहेबांना एक वर्ष मुख्यमंत्रीपद दिलं जाऊ शकतं. नाहीतर पाच वर्ष मुख्यमंत्री हे भाजपकडेच राहील. भाजपने सांगितलं अडीच अडीच वर्ष तर



अडीच वर्ष होईल आणि पुढच्या अडीच वर्षात देखील भाजपचाच राहील, असंही यावेळी बोलताना रोहित पवारांनी म्हटलं आहे.

मुख्यमंत्री हा भाजपचा झाला तर होईल फक्त देवेंद्र फडणवीस होतील, की...

अजित दादांना मुख्यमंत्रीपद दिलं जाईल का? या प्रश्नावर बोलताना रोहित पवार म्हणाले, अजितदादांना मुख्यमंत्री पद दिले तर चांगली गोष्ट आहे. आम्ही सुद्धा त्या गोष्टीचे स्वागत करू. अभिनंदन करू. पण भाजपाला तुम्ही चांगल्या पद्धतीने जर ओळखत असाल तर भाजप सहजपणे अजित दादांना मुख्यमंत्री बनवतील असं नाही. एकनाथ शिंदे यांना गेल्या अडीच ते तीन वर्षापासून मुख्यमंत्री पद दिलं असल्यामुळे आता एकनाथ शिंदे साहेबांना मुख्यमंत्रीपद मागण्याचा अधिकार आहे. म्हणून फक्त ते थोडंसं पुढे मागे करत आहेत. जर त्यांना गेल्या अडीच तीन वर्षात मुख्यमंत्री पद मिळाला नसतं तर मग एकनाथ शिंदे यांनी देखील मुख्यमंत्रीपद मागितले नसते. त्यामुळे शेवटी भाजपाला ताकद खूप मोठी मिळालेली आहे. मुख्यमंत्री हा भाजपचा झाला तर होईल फक्त देवेंद्र फडणवीस होतील, की महाराष्ट्रातील एक भाजपचा नेता जो २०१९ ला त्याला तिकीट नाही. त्या नेत्याने केंद्रात जाऊन चांगली काम केली, अशा व्यक्तीला दिला जाईल. हे मात्र सांगता येणार नाही असंही रोहित पवारांनी म्हटलं आहे.

रोहित पवारांच्या या वक्तव्यानंतर आता चर्चांना उधाण आलं आहे. रोहित पवारांनी केलेल्या या वक्तव्यानंतर आता विनोद तावडेच ते नेते आहेत का? मुख्यमंत्री पदासाठी त्यांच्या नावाचा विचार सुरू आहे का? अशा चर्चा आता सुरू आहेत.

# किरकोळ कारणावरून तरुणाचा खून; मावळातील इंदोरी येथील धक्कादायक घटना

वडगाव मावळ : राज्यामध्ये गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे. तरुणांमध्ये अवघ्या शिल्लक कारणांवरुन थेट चाकू खुपसून खून केले जात आहेत. अशीच एक घटना आता वडगाव मावळमध्ये देखील घडली आहे. यामुळे सर्व परिसरामध्ये आश्चर्य व्यक्त केले जात असून भीतीचे वातावरण आहे. वेटरला मारहाण केल्याच्या किरकोळ कारणावरून हॉटेल मालकाने तरुणांचा कोयत्याने वार करत खून केला. ही घटना मंगळवारी (दि.२७) रात्री ११.३० वाजण्याच्या सुमारास हॉटेल जय मल्हार समोर मावळमधील इंदोरी येथे घडली



वडगाव मावळमध्ये झालेल्या या खुनामध्ये तरुण मुलाचा बळी गेला आहे. प्रसाद उर्फ किरण अशोक पवार (वय २७, रा. कानेवाडी, ता. मावळ) असे खून झालेल्या या तरुणाचे नाव आहे. या घटनेमध्ये प्रसाद याचा मित्र अभिषेक अशोक येवले (वय ३१, रा. कानेवाडी, ता. मावळ) हा गंभीर जखमी झाला आहे. अक्षय दत्तात्रय येवले (वय ३०, रा. कुंडमळा, ता. मावळ) असे आरोपीचे नाव आहे. त्याला पोलिसांनी अटक केली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक रणजीत जाधव यांनी दिलेल्या माहितीनुसार, इंदोरी बायपास येथे असलेल्या हॉटेल जय मल्हार तेथे मंगळवारी रात्री पावणे दहा वाजताच्या सुमारास प्रसाद उर्फ किरण पवार आणि त्याचा मित्र अभिषेक येवले यांनी जय मल्हार हॉटेलमधील वेटरला मारहाण केली होती. प्रसाद, अभिषेक आणि हॉटेल मालक अक्षय हे मित्र आहेत. तर अक्षय आणि अभिजीत हे चुलत भाऊ आहेत.

मारहाण झाल्याची माहिती वेटरने हॉटेल मालक अक्षय येवले यास दिली. हॉटेल मालक अक्षय याने त्याचे मित्र प्रसाद पवार व अभिषेक येवले यांना आपण एकाच गावचे आहोत. तरीही तू माझ्या लोकांना येऊन मारतो. भांडण करू नको असे सांगितले होते. त्यावरून फोनवरच दोघांच्यात शिवीगाळ झाली होती. प्रसाद व अभिषेक हॉटेलमधून निघून गेले. रात्री साडे अकरा वाजता प्रसाद व अभिषेक हे कोयता घेऊन हॉटेल जवळ पुन्हा आले. त्यावेळी हॉटेल मालक अक्षय येवले हे हॉटेल बंद करून त्यांची वाट बघत थांबला होता. हॉटेल मालक अक्षय येवले व त्यांच्यात वादावादी होऊन आरोपी अक्षय येवले याने त्यांच्या हातातील कोयता घेऊन दोघांनाही गंभीर जखमी केले.

तळेगाव एमआयडीसी पोलीस गस्त घालत असताना त्यांना याबाबत माहिती मिळाली पोलिसांनी जखमींना प्राथमिक आरोग्य केंद्र तळेगाव दाभाडे व तेथून पवना हॉस्पिटल येथे दाखल केले असता त्यातील जखमी प्रसाद उर्फ किरण अशोक पवार याचा मृत्यू झाला. तर अभिषेक हा गंभीर जखमी झाला आहे. पोलिसांनी अक्षय येवले याला अटक केली आहे. तळेगाव एमआयडीसी पोलीस तपास करीत आहेत.

# प्रो कबड्डी लीगच्या ११व्या पर्वातील प्ले ऑफ आणि अंतिम लढत पुण्याला, २९ डिसेंबर रोजी रंगणार फायनल



पुणे : प्रो कबड्डी लीगच्या (पीकेएल) ११व्या पर्वातील प्ले ऑफ आणि अंतिम लढत पुण्यात म्हाळुंगे बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलातील बॅडमिंटन हॉल येथे २६ ते २९ डिसेंबर दरम्यान होणार आहेत. संयोजकांच्या वतीने बुधवारी ही घोषणा करण्यात आली. अंतिम सामने २६ डिसेंबर ते २९ डिसेंबर २०२४ या कालावधीत बालेवाडी क्रीडा संकुलाच्या बॅडमिंटन हॉलमध्ये होणार आहेत. पुणे आयोजित करण्यात येणार आहे.

गुरुवारी २६ डिसेंबर रोजी एलिमिनेटर्स सामने

लीग टप्प्यातील अव्वल दोन संघ थेट उपांत्य फेरीसाठी पात्र ठरणार आहेत. तिसऱ्या, चौथ्या, पाचव्या आणि सहाव्या स्थानावरील संघ २६ डिसेंबर रोजी एलिमिनेटर टप्प्यात आमने-सामने येतील. तिसऱ्या क्रमांकावर येणारा संघ एलिमिनेटर १ मध्ये सहाव्या स्थानावर असलेल्या संघाशी खेळेल. चौथ्या स्थानावरील संघ पाचव्या स्थानावरील संघाशी एलिमिनेटर २ मध्ये खेळेल.

उपांत्य फेरी २७ डिसेंबर रोजी होणार

एलिमिनेटर १चा विजेता उपांत्य फेरीत गुणतालिकेतील अव्वल स्थानावर असणाऱ्या संघाशी खेळेल. एलिमिनेटर २ चा विजेता दुसऱ्या उपांत्य फेरीत गुणतालिकेतील दुसऱ्या स्थानावरील संघाशी खेळेल. या दोन्ही उपांत्य लढती २७ डिसेंबर रोजी खेळल्या जातील. त्यानंतर ११व्या पर्वाची अंतिम लढत २९ डिसेंबर रोजी होईल. लीगचा दुसरा टप्पा सध्या नोएडा येथे सुरु आहे. हा टप्पा १ डिसेंबरपर्यंत चालणार आहे. त्यानंतर ३ डिसेंबर ते २४ डिसेंबर दरम्यान अखेरचा टप्पा पुण्यातच खेळविला जाणार आहे. त्यानंतर प्ले ऑफ लढती होतील.